दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २५६ I सोमवार २९ जून २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

**पोलिओमुक्त भारत...** भेंडा : माननीय सरपंच वर्षा वैभव नवले व उपसरपंच सोपान महापूर यांच्या हस्ते राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम उपकेंद्र भेंडा खुर्द.येथे मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. बालकांना पोलिओ डोस देण्यात आले.



**महत्त्वाचे..**

### राज्यात पावसाचा जोर वाढणार

पुणे : मागील आठवड्यात मोसमी पावसाने संपूर्ण राज्य व्यापले असून त्यानंतरच्या दोन दिवसात राज्यातील काही भागात मुसळधार पावसाची नोंद झाली. मात्र, मागील काही दिवसांपासून राज्यात मोसमी पावसाने काहीशी विश्रांती घेतल्याचे चित्र आहे. त्यामुळे कमाल तापमानात चढ-उतार होत असून रविवारी काही भागात वादळी पावसाची नोंद झाली तर सोमवारपासून पुढील तीन दिवस राज्याच्या कोकण किनारपट्टीसह घाट विभागात पावसाचा जोर काहीसा वाढेल, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे पुढील काही दिवसात मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय होण्याचा अंदाज आहे. यंदा मोसमी पाऊस तळकोकणात दाखल झाल्यापासून त्याचा वेग काहीसा संथ असल्याचे दिसून येत आहे.

# थायलंडमध्ये नोकरीचे आमिष...

## ८०० भारतीय म्यानमार सीमेवर ओलीस!

- **महाराष्ट्रातील २५ तरुण अडकले**
- **सायबर माफियांच्या आंतरराष्ट्रीय रॅकेटचा पर्दाफाश**
- **बीड पोलिसांचा थेट परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क**

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**बीड :** थायलंडमध्ये महिन्याला ७० हजार रुपये पगाराच्या नोकरीचे आमिष दाखवून महाराष्ट्रातील २५ तरुणांसह तब्बल ८०० भारतीयांना म्यानमार-थायलंड सीमेवरील कुप्रसिद्ध 'गोल्डन ट्रँगल' परिसरातील अज्ञात छावण्यांमध्ये ओलीस ठेवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या तरुणांकडून बंदुकीच्या धाकावर दिवसाला तब्बल १८ ते १८ तास ऑनलाइन फसवणूक करून घेतली जात असून, विरोध करणाऱ्यांवर अमानुष अत्याचार केले जात असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणामुळे आंतरराष्ट्रीय मानवी तस्करी आणि सायबर गुन्हेगारीचे मोठे रॅकेट उघड झाले असून, बीड पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून थेट केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधला आहे.केज तालुक्यातील २४ वर्षीय तरुणाला फेसबुकवरील जाहिरातीद्वारे बँकॉक येथे उच्च पगाराची नोकरी देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. ४ जून रोजी तो पुण्याहून थायलंडला पोहोचल्यानंतर त्याला फसवून म्यानमार सीमेवरील जंगलातील छावणीत नेण्यात आले. तेथे त्याचा पासपोर्ट आणि इतर कागदपत्रे जप्त करण्यात आली. त्यानंतर त्याला आणि इतर भारतीयांना एका लहानशा खोलीत कोंडून ऑनलाइन आर्थिक फसवणुकीचे काम करण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप आहे. काम करण्यास नकार देणाऱ्यांना विजेचे शॉक, अमानुष मारहाण आणि जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचे पीडित तरुणाने पत्नीशी लपतछपत संपर्क साधून सांगितले. माझा जीव धोक्यात आहे... माझ्यासमोर तीन जणांना ठार मारण्यात आले, अशी त्याची आर्त हाक ऐकताच कुटुंबीयांनी बीड पोलिसांकडे धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत तपास सुरू केला असून, अडकलेल्या सर्व भारतीयांच्या सुटकेसाठी केंद्र सरकारच्या यंत्रणांशी समन्वय सुरू केला आहे.

**पोलीस अधीक्षक नवनीत काँवत म्हणाले...**



बीडच्या आणि राज्यातील इतर सर्व युवकांच्या सुखरूप सुटकेसाठी आम्ही वरिष्ठ पातळीवर राज्य सरकार आणि थेट केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाशी पत्रव्यवहार केला असून त्यांच्याशी सतत संपर्कात आहोत. या आंतरराष्ट्रीय रॅकेटच्या मुळाशी जाण्यासाठी आणि अडकलेल्या तरुणांना मायदेशी सुखरूप परत आणण्यासाठी सर्वतोपरी कायदेशीर प्रयत्न वेगाने सुरू आहेत.

* **थायलंडमध्ये नोकरीचे आमिष दाखवून मानवी तस्करी**
* **म्यानमार सीमेवरील 'गोल्डन ट्रँगल'मध्ये बेकायदेशीर छावण्या**
* **बंदुकीच्या धाकावर १८ तास सायबर फसवणुकीचे काम**
* **विरोध करणाऱ्यांवर विजेचे शॉक, मारहाण आणि जीवे मारण्याच्या धमक्या**

# धाराशिवमध्ये ५०० कोटींचे प्लॉट खरेदी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**ईडीचा ससेमीरा नको म्हणून खा. ओमराजे शिंदे गटात : खा. राऊत**

धाराशिव : धाराशिवमध्ये आयोजित केलेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या मेळाव्यात खासदार संजय राऊत यांनी नुकताच शिंदे गटात प्रवेश केलेल्या खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. धाराशिवमध्ये ऑपरेशन तुडवा सुरु झाले आहे आणि ते सक्सेस झालं आहे. गद्दार, भामटा आणि सोंगाड्या असे म्हणत अगदी शेलक्या शब्दात राऊतांनी ओमराजेंचा समाचार घेतला आहे. तसेच ओमराजे निंबाळकरांनी शिवसेना का सोडली? याबाबत देखील संजय राऊत यांनी खुलासा केला आहे.

**धाराशिवमध्ये ऑपरेशन तुडवा सुरु**

धाराशिवमध्ये ऑपरेशन तुडवा सुरु झाले आहे आणि ते सक्सेस झालं आहे. कैलास पाटील यांनी सांगितलं आहे, शिवसैनिकाला वाऱ्यावर सोडणार नाही, उद्धव ठाकरेंची साथ सोडणार नाही, असा निष्ठावंत आमदार उद्धव साहेबाला मिळाला असल्याचे संजय राऊत म्हणाले. हा गद्दार भामटा आणि सोंगाड्या आहे. याने भामटेगिरी केली आहे. हा भाषणामध्ये सांगायचा की, २००६ साली मी ग्रामपंचायतीचा सदस्य देखील नव्हतो. मला उद्धवसाहेबांनी साथ दिली. त्यामुळं मी एक वेळा आमदार झालो दोन वेळा खासदार झालो. उद्धवसाहेबांना कधी सोडणार नाही म्हणाला मग आता काय केलं? 'भामट्या गद्दारा १०० कोटीला विकला गेला' अशी टीका राऊतांनी ओमराजेंवर केली.




उद्धव ठाकरेंनी धाराशिवमधून फुटीर खासदारांवर निशाणा साधला, त्यात ओमराजे निंबाळकरांनाही लक्ष्य केलं, यावेळी त्यांनी गद्दाराची डाग कसा पुसणार असे म्हणत जुन्या भाषणांची आठवण करुन दिली. धाराशिवमध्ये आज उद्धव ठाकरेंची जाहीर सभा झाली, या सभेला आदित्य ठाकरे, संजय राऊत, अनिल देसाई, अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे, आमदार कैलास पाटील, आमदार स्वामी व्यासपीठावर होते. सर्वप्रथम धाराशिवच्या शिवसैनिकांच्यावतीने उद्धव ठाकरेंच्या हाती भवानी तलवार, गळ्यात कवड्याची माळ घालून त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, तुळजाभवानी मातेची प्रतिकृतीही देण्यात आली. उद्धव ठाकरेंनी आपल्या भाषणात सुरुवातीपासूनच ओमराजे निंबाळकर यांच्यावर हल्लाबोल केला. भाजप, एकनाथ शिंदे यांच्यासह ओम राजेंवर सडकून टीका केली.

'हा भामटा का गेला'? असे सांगताना संजय राऊत म्हणाले की, त्याने प्रचंड भ्रष्टाचार केल्याची टीका ओमराजे निंबाळकरांवर केली. आता मला असेही वाटत आहे की, त्याच्या वडिलांचा जो खून झाला आहे, त्या खुनामागे देखील वेगळं काहीतरी रहस्य आहे, असे संजय राऊत म्हणाले. हा गेला कारण पनराजे मल्टिस्टेट या त्याच्या कंपनीने ५०० कोटींचे प्लॉट आख्ख्या धाराशिवमध्ये खरेदी केले. त्याची ईडीकडून चौकशी लागली म्हणून तो शिंदे गटात गेला असल्याचा आरोप **(पान ४ वर)**

# काष्टी बाजारातून बैल खरेदी करून परतणाऱ्या शेतकऱ्यांना मारहाण

**गोरक्षकांच्या नावाखाली कारवाईचा आरोप, खोटा गुन्हा दाखल**

**श्रीगोंदा : दादा सोनवणे**

तालुक्यातील काष्टी येथील जनावरांच्या बाजारातून बैल खरेदी करून परतणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील दोन शेतकऱ्यांना गोरक्षकांनी अडवून मारहाण केल्याचा तसेच त्यानंतर श्रीगोंदा पोलिसांनी त्यांच्यावरच खोटा गुन्हा दाखल केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित पोलिसांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी १ जुलैपासून नाशिक येथे विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

धाराशिव जिल्ह्यातील यश अतुल हरकर आणि गणेश जावळे (रा. धाराशिव) यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २७ जून रोजी काष्टी येथील जनावरांच्या बाजारातून त्यांनी प्रत्येकी दोन असे चार बैल खरेदी केले. त्याच्या श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अधिकृत पावत्याही घेतल्या. बैल घेऊन परतत असताना एका चारचाकी वाहनातून आलेल्या एक महिला आणि तीन जणांनी मिळून त्यांची गाडी अडवून गुरे कापण्यासाठी नेत आहात असा आरोप करत बेदम मारहाण केली.त्यानंतर संबंधितांनी दोन्ही शेतकऱ्यांना श्रीगोंदा पोलीस ठाण्यात आणले. बाजार समितीच्या पावत्या आणि शेतकरी असल्याचे पुरावे दाखवूनही पोलिसांनी त्यांच्याविरोधातच गुन्हा दाखल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.या प्रकरणातील मारहाण करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी पोलिसांनी आमच्यावरच खोटा गुन्हा दाखल केला असून संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा १ जुलैपासून नाशिक येथील विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.दरम्यान, या प्रकरणाबाबत श्रीगोंदा पोलिसांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून, पोलिसांकडून स्पष्टीकरण मिळाल्यानंतर वस्तुस्थिती अधिक स्पष्ट होणार आहे.मात्र याबात प्रतिक्रिया घेण्यासाठी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे याना संपर्क केला असता त्यांनी सांगितले मी सुट्टीवर आहे काय आहे ते उद्या पाहून सांगतो **(पान ४ वर)**

## पत्र्याच्या छतावर खेळण्यासाठी गेलेल्या १४ वर्षीय बालकाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री




**राहुरी :** खेळण्यासाठी पत्र्याच्या छतावर गेलेल्या १४ वर्षीय शाळकरी मुलाला विजेच्या शॉक लागून त्याचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना राहुरी तालुक्यातील सडे येथे दि. २८ जून रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली.

यशदिप कृष्णा झडे, वय १४ वर्षे, हा मुलगा राहुरी तालुक्यातील सडे येथील झडे वस्ती येथे राहत असून तो विद्यापीठ येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय या शाळेत इयत्ता ६ वीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. दि. २८ जून २०२६ रोजी रविवारी शाळेला सुट्टी असल्याने सकाळी ११.३० वाजे दरम्यान यशदिप हा त्यांच्या घराच्या पत्र्याच्या छतावर खेळण्यासाठी गेला होता. त्या ठिकाणी त्याला विजेचा जबरदस्त शॉक लागून तो जागीच गतप्राण झाला. घटना लक्षात येताच परिसरातील काही तरुणांनी त्याला ताबडतोब राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला तपासून उपचारा पूर्वीच मयत घोषित केली. त्याच्या मृतदेहावर शवविच्छेदन करण्यात आले. या प्रसंगी नातेवाईकांनी प्रचंड गर्दी केली होती. दरम्यान यशदिप याच्या आई- वडीलांनी मुलाचा मृतदेह पाहताच ते बेशुद्ध झाले. त्यांच्यावर शहरातील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे सडे परिसरात प्रचंड हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटने बाबत राहुरी पोलीस ठाण्यात आकस्मात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# व्हाट्सअ‍ॅप पोस्टचा वाद पेटला!

## ममदापूरमध्ये मोबाईल दुकानावर जबरी हल्ला, सात जणांवर गुन्हे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** राहाता तालुक्यातील ममदापूर येथे व्हाट्सअ‍ॅप पोस्टवरून झालेल्या वादाचे रूपांतर एका भीषण हिंसक घटनेत झाले आहे. गावातील एका मोबाईल दुकानात घुसून दुकानदाराला बेदम मारहाण करणे, दुकानाची मोठ्या प्रमाणावर तोडफोड करणे आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध 'भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३' च्या विविध गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महमदईसरार ईलियास देशमुख (वय ३८, रा. ममदापूर, ता. राहाता) यांनी या प्रकरणी लोणी पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादी देशमुख हे ममदापूर येथे मोबाईल शॉपी चालवतात ते

२६ जून रोजी सायंकाळी फिर्यादी नमाज अदा करून घरी परतत असताना, आरोपींनी त्यांनी व्हाट्सअ‍ॅप ग्रुपवर टाकलेल्या एका पोस्टवरून जाब विचारला असता तिथे त्यांच्यात वाद झाला, मात्र




स्थानिक नागरिकांनी मध्यस्थी करत तात्पुरता वाद मिटवला होता मात्र

२७ जून रोजी दुपारी ४:३० वाजता हाच वाद मनात धरून आरोपींनी फिर्यादीच्या मोबाईल दुकानात जबरदस्तीने प्रवेश केला आणि थेट हल्ला चढवला, दुकानात घुसून हॉकी स्टिक, लाकडी दांड्यांनी बेदम मारहाण करत आरोपींनी हातात लाकडी दांडे आणि हॉकी स्टिक घेऊन दुकानात धुमाकूळ घातला. त्यांनी फिर्यादी देशमुख यांना बेदम मारहाण केली. एवढेच नव्हे तर दुकानातील मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक साहित्य, आणि काउंटरच्या फर्निचरची मोठ्या प्रमाणावर तोडफोड करून नुकसान केले.

एकालाही जिवंत सोडू नका, तंगडी मोडा! अशी ओरडून धमकी देत आरोपींनी परिसरात प्रचंड दहशत निर्माण केली. यावेळी दुकानात उपस्थित असलेल्या इतर काही जणांनाही आरोपींनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी लोणी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरून एकूण ७ जणांविरोधात भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ नुसार गुन्हा दाखल केला आहे. आरोपी नामे मोईन मुस्ताकअली पटेल, मतीन मुस्ताकअली पटेल, शौकत हैयातअली पटेल,मुजाईद शौकतअली पटेल, महारुफ मोईनअली पटेल,प्रदीप बाळासाहेब कदम,राजेंद्र राजाराम पारखे या ७ आरोपीविरुद्ध इछड कलम ३३२(अ), ३३३, ११८(१), १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३२४(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच लोणी पोलिसांनी तातडीने ममदापूर येथे धाव घेत घटनास्थळाचा पंचनामा केला. या घटनेमुळे ममदापूर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने सध्या परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब सांगळे करत असून पोलीस आरोपींचा कसून शोध घेत आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि गावात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन लोणी पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## सगळ्या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण घोषित करा : आ. अभ्यंकर

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** टीईटी पेपर फुटीची सीबीआय चौकशी व्हावी, अशी आमची मागणी आहे. हे प्रकरण महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही, यात ज्यांचा सहभाग आहे ते बाहेरच्या राज्यातील आहेत. त्यांची रीतसर चौकशी करण्याकरता सीबीआय सक्षम आहे, म्हणून ही चौकशी होणे आवश्यक आहे. यामुळे शिक्षकांचे फार मोठे नुकसान होत आहे. त्यांनी खूप मेहनत घेतली आहे. ज्या परिस्थितीत त्यांनी मेहनत घेतली, गेली वर्षभर शासन निर्णयानंतर शिक्षक गंभीर होऊन तयारीला लागले. या काळात शाळा, परीक्षा घेणे, त्यानंतर शासनाने दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडून त्यांनी टीईटीची तयारी केलेली आहे. एवढी मोठी त्यांनी मेहनत घेतली आहे. आता पेपर फुटल्याने त्यांची मेहनत वाया जाऊ नये म्हणून परीक्षेला बसणार होते, त्या सर्व शिक्षकांना उत्तीर्ण घोषित करा अशी मागणी आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी केली.

राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षा प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या पेपरफुटीच्या निषेधार्थ रविवारी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने जोगेश्वरी पूर्व येथील इस्माईल युसुफ कॉलेज परिसरामध्ये असलेल्या शिक्षण निरीक्षक कार्यालयाबाहेर तीव्र आंदोलन करण्यात आले.

सर्व शिक्षकांना उत्तीर्ण म्हणून घोषित करावं. जसं जुन्या शिक्षकांना डीम ट्रेन घोषित केलं होतं, तसेच आमच्या सर्व शिक्षकांना डीम ट्रेन म्हणून घोषित करावं. मी यात २८९ ची सूचना दिली आहे. ज्या मागण्या मी केल्या आहेत, त्या संदर्भात शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली नाही. यात राज्य शासनाच्या वतीने काही ढिसाळपणा झाला आहे का हे स्पष्ट झालं नाही. जर यंत्रणेची चूक असेल, तर नैतिक जबाबदारी म्हणून ती मंत्र्यांनी देखील स्वीकारली पाहिजे, असे देखील ज. मो. अभ्यंकर म्हणाले.

# अन्न व औषध प्रशासन आयुक्त मुंडे यांच्या कारवाईविरोधात मुंबईत पान व्यावसायिकांचा धडक मोर्चा

## ३ जुलैला अहिल्यानगरात जिल्हास्तरीय मेळावा; राज्यभरातून मोठ्या सहभागाचे आवाहन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त मुंडे यांच्या नेतृत्वाखाली पान व्यावसायिकांवर सुरू असलेल्या कारवाईच्या निषेधार्थ महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाने ७ जुलै २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी धडक मोर्चाचे आयोजन केले आहे. या मोर्चात राज्यभरातील लाखो पान व्यावसायिक सहभागी होणार असून, शासनाने पान व्यावसायिकांवरील कारवाया तातडीने थांबवाव्यात, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात येणार आहे.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सीताबन लॉन, सुखसागर हॉटेलमागे, कोठी रोड, मार्केट यार्ड, अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अजित सूर्यवंशी उपस्थित राहून आंदोलनाची दिशा स्पष्ट करणार आहेत.

महासंघाच्या म्हणण्यानुसार, अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सुगंधित तंबाखूविरोधातील कारवाई, मोक्का अंतर्गत दाखल होणारे गुन्हे तसेच पान व्यावसायिकांवर होत असलेल्या कठोर कारवाईमुळे राज्यभरातील पानपट्टीधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कारवाया अन्यायकारक असल्याचा आरोप महासंघाने केला आहे.

मोर्चाद्वारे शासनाकडे पान व्यावसायिकांवरील कारवाया थांबविणे, सुगंधित तंबाखूवरील बंदीचा पुनर्विचार करणे, व्यावसायिकांना आर्थिक मदत व कर्जसुविधा उपलब्ध करून देणे, पान व्यवसायासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे तसेच पान दुकानधारकांच्या कुटुंबीयांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली जाणार आहे.

अहिल्यानगर जिल्हा पान असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष फैय्याज तांबोळी यांनी जिल्ह्यातील पानपट्टीधारक, घाऊक व्यापारी, फेरीवाले आणि संबंधित सर्व व्यावसायिकांनी ३ जुलैच्या मेळाव्यासह ७ जुलैच्या मुंबईतील धडक मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होऊन संघटनेची ताकद दाखवावी, असे आवाहन केले आहे.

# युद्ध, डॉलर आणि मोदींचे आवाहन... सोन्याच्या घसरणीमागचे सत्य




सोन्याच्या किमती घसरल्या की सामान्य माणसाच्या मनात पहिला प्रश्न निर्माण होतो, ''आता सोने घ्यावे का?'' परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, सोने स्वस्त झाले तरी त्यामागचे खरे कारण काय आहे? केवळ पंतप्रधानांच्या आवाहनामुळे बाजार खाली आला की त्यामागे जागतिक अर्थकारणातील काही मोठे बदल आहेत? या प्रश्नाचे उत्तर शोधणे आज आवश्यक ठरते.

मे महिन्याच्या सुरुवातीला पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती, इराण–इस्रायल संघर्ष, जागतिक व्यापारातील अनिश्चितता आणि डॉलरमधील अस्थिरता यामुळे सोन्याने विक्रमी उच्चांक गाठला. गुंतवणूकदारांनी शेअर बाजार आणि इतर जोखमीच्या गुंतवणुकीतून पैसा काढून सुरक्षित पर्याय म्हणून सोन्याकडे धाव घेतली. परिणामी सोन्याचा दर प्रति दहा ग्रॅम दीड लाख रुपयांच्या पुढे गेला, तर चांदीनेही विक्रमी पातळी गाठली.

अशा पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना काही काळ नवीन सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केले. त्यामागे उद्देश स्पष्ट होता. भारत आपल्या गरजेचे बहुतांश सोने परदेशातून आयात करतो. मोठ्या प्रमाणावर होणारी आयात म्हणजे परकीय चलनाचा मोठा खर्च. युद्धाच्या काळात आयात कमी झाली तर परकीय चलनाचा साठा सुरक्षित राहतो आणि चालू खात्यावरील ताणही कमी होतो. त्यामुळे हे आवाहन केवळ भावनिक नव्हते, तर त्यामागे व्यापक आर्थिक विचार होता.

याच काळात केंद्र सरकारने सोन्या–चांदीवरील आयात शुल्क वाढवण्याचाही निर्णय घेतला. सामान्यपणे आयात शुल्क वाढले की वस्तू महाग होतात. त्यामुळे अनेकांना वाटले की सोने आणखी महाग होईल. सुरुवातीला तशीच परिस्थिती निर्माण झाली; मात्र काही दिवसांत चित्र पूर्णपणे बदलले. याचे कारण बाजारातील मागणी आणि पुरवठ्याच्या अर्थशास्त्रात दडलेले आहे. आयात शुल्क वाढल्याने आणि पंतप्रधानांच्या आवाहनानंतर ग्राहकांनी खरेदी पुढे ढकलली. लग्नसराईतही अनेकांनी नवीन दागिने घेण्याऐवजी जुने दागिने वापरण्याचा किंवा पुनर्वापर करण्याचा मार्ग स्वीकारला. परिणामी देशांतर्गत मागणी कमी झाली. व्यापाऱ्यांकडे साठा वाढू लागला आणि बाजाराने आपोआप दर खाली आणण्यास सुरुवात केली.

मात्र इतकेच कारण पुरेसे नाही. प्रत्यक्षात सोन्याच्या किमती ठरविणारा सर्वात मोठा घटक म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजार. जागतिक बाजारात सोन्याची किंमत डॉलरमध्ये निश्चित होते. अमेरिकेची अर्थव्यवस्था मजबूत दिसू लागली, रोजगाराची आकडेवारी अपेक्षेपेक्षा चांगली आली आणि अमेरिकन डॉलर पुन्हा मजबूत झाला. त्याचबरोबर अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने व्याजदर तातडीने कमी करण्याची शक्यता कमी असल्याचे संकेत दिले. व्याजदर जास्त राहिल्यास गुंतवणूकदार सोन्याऐवजी बाँड्स आणि डॉलरमध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे जागतिक स्तरावर सोन्यावर विक्रीचा दबाव निर्माण झाला.

दुसरीकडे, पश्चिम आशियातील तणाव काही प्रमाणात नियंत्रणात आल्यामुळे सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याची मागणीही कमी झाली. म्हणजेच भीती कमी झाली की सोन्याची चमकही कमी होते, हा बाजाराचा जुना नियम पुन्हा एकदा सिद्ध झाला.

यामुळे भारतात दिसलेली सोन्याच्या दरातील घसरण ही दोन घटकांच्या संगमातून झाली. एकीकडे देशांतर्गत मागणी कमी झाली, तर दुसरीकडे जागतिक बाजारातही किमती खाली आल्या. त्यामुळे आयात शुल्क वाढलेले असतानाही देशांतर्गत बाजारातील दर घसरले. त्यामुळे ''फक्त मोदींच्या आवाहनामुळेच सोने स्वस्त झाले'' असा निष्कर्ष काढणे जितके चुकीचे आहे, तितकेच ''सरकारच्या निर्णयाचा काहीच परिणाम झाला नाही'' असे म्हणणेही वास्तवाला धरून ठरणार नाही. ग्राहकांच्या मानसिकतेत झालेला बदल आणि जागतिक बाजारातील घडामोडी या दोन्ही कारणांचा एकत्रित परिणाम या घसरणीत दिसून आला.

यातून सरकारसाठीही एक महत्त्वाचा धडा आहे. भारत हा जगातील सर्वात मोठ्या सोन्याच्या ग्राहकांपैकी एक देश आहे. त्यामुळे केवळ आयात शुल्क वाढवून प्रश्न सुटणार नाही. देशांतर्गत सुवर्ण पुनर्वापर उद्योगाला चालना देणे, गोल्ड बाँडसारख्या पर्यायी गुंतवणूक योजनांना बळ देणे, डिजिटल गोल्डसारख्या पर्यायांबाबत जनजागृती करणे आणि सोन्यावरील अवलंबित्व कमी करणे, ही दीर्घकालीन धोरणे अधिक परिणामकारक ठरू शकतात.

सामान्य ग्राहकांसाठीही हा काळ संयमाचा आहे. सोन्याचे दर घसरले म्हणून ते पुन्हा वाढणार नाहीत, असे म्हणता येत नाही. उलट पश्चिम आशियातील परिस्थिती पुन्हा बिघडली, अमेरिकेचे व्याजदर बदलले किंवा जागतिक अर्थव्यवस्थेत नवीन संकट निर्माण झाले, तर सोन्याचे दर पुन्हा झपाट्याने वाढू शकतात. त्यामुळे केवळ अल्पकालीन चढ–उतार पाहून निर्णय घेण्याऐवजी दीर्घकालीन आर्थिक नियोजन महत्त्वाचे ठरते.

सोन्याच्या बाजाराने पुन्हा एकदा हे दाखवून दिले आहे की, आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत कोणत्याही एका कारणामुळे किमती बदलत नाहीत. राजकीय घडामोडी, युद्ध, डॉलरची ताकद, मध्यवर्ती बँकांचे निर्णय, ग्राहकांची मानसिकता आणि सरकारी धोरणे या सर्वांचा एकत्रित परिणाम बाजारावर होत असतो. त्यामुळे सोन्याच्या घसरणीकडे केवळ स्वस्ताई म्हणून न पाहता, जागतिक अर्थकारणातील बदलांचा आरसा म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल.

# सोशल मीडिया पोस्टप्रकरणी नाना लोखंडेंवर अब्रूनुकसानीचा खटला

## कुंकूलोळ यांच्या तक्रारीवरून नाना लोखंडेंविरुद्ध न्यायालयाचा आदेश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** माजी केंद्रीय मंत्री डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या कोल्हार बुद्रुक येथील जमिनीच्या खरेदी व्यवहारासंदर्भात सोशल मीडियावर मानहानीकारक व धमकीवजा पोस्ट प्रसिद्ध केल्याप्रकरणी राहता येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने नाना शंकर लोखंडे यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४९९ व ५०० अन्वये फौजदारी अब्रूनुकसानीचा खटला चालविण्याचे आदेश दिले आहेत. ही माहिती उद्योजक अजित झुंबरलाल कुंकूलोळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सन २०२३ मध्ये डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या कोल्हार बुद्रुक येथील जमिनीचा खरेदी व्यवहार कुंकूलोळ कुटुंबीयांनी कायदेशीर प्रक्रियेनुसार पूर्ण केला होता. असे असताना, केवळ बदनामी करण्याच्या व स्वार्थ साधण्याच्या उद्देशाने नाना लोखंडे यांनी सोशल मीडियावर कुंकूलोळ कुटुंबीयांविरोधात मानहानीकारक पोस्ट प्रसिद्ध केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी न्यायालयाने उपलब्ध पुराव्यांची छाननी करून भारतीय दंड संहितेच्या कलम ४९९ व ५०० अंतर्गत गुन्हा चालविण्यासाठी प्रथमदर्शनी पुरेसे सबळ पुरावे असल्याचे नमूद केले आहे. यापूर्वी नाना लोखंडे यांनी विविध प्रशासकीय व निमन्यायिक प्राधिकरणांकडे या व्यवहारासंदर्भात तक्रारी दाखल केल्या होत्या. मात्र, आवश्यक पुरावे सादर करण्यात अपयश आल्याने त्या सर्व तक्रारी निकाली काढण्यात आल्याचा दावा कुंकूलोळ यांनी केला. अनेक वेळा मुदतवाढ देऊनही कोणतेही ठोस दस्तऐवज सादर करण्यात आले नसल्याचे त्यांनी सांगितले.

कोणत्याही कायदेशीर आधाराशिवाय सोशल मीडियावर एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचविणारे आरोप करणे हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा असल्याचेही न्यायालयाने आपल्या निरीक्षणात नमूद केल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

न्यायालयाने अजित कुंकूलोळ यांच्या सामाजिक कार्याचीही दखल घेतली. ते कोल्हार भगवतीपूर ग्रामपंचायतीचे माजी सदस्य, कोल्हार मर्चंट असोसिएशनचे सलग दहा वर्षे अध्यक्ष राहिले असून, कोरोना महामारीच्या काळात १५ हजारांहून अधिक स्थलांतरित मजुरांना अन्न व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्याचा उल्लेख न्यायालयाने केला आहे. या प्रकरणात त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेला धक्का पोहोचल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याचे निरीक्षणही नोंदविण्यात आले. उद्योजक अजित कुंकूलोळ यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. श्रीनिवास डागा आणि मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता डॉ. शेखर बोऱ्हाडे यांनी न्यायालयात बाजू मांडली.

# घरपट्टी विरोधात श्रीरामपूरला छल्लारे मैदानात

## आ. काळेंची घरपट्टीला स्थगिती; आ. ओगले यांचे मौन

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर–** अन्यायकारक घरपट्टी अमान्य असून नगरपालिका प्रशासनाने नागरिकांकडून न्याय्य आणि नियमबद्ध घरपट्टीचीच आकारणी करावी, अशी मागणी जिजामाता तरुण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी ज्येष्ठ उपनगराध्यक्ष श्री संजय छल्लारे यांनी केली आहे. छल्लारे म्हणाले की, घरपट्टी आकारणी करणे हा पालिकेचा हक्क आहे. ही रद्द होणारा निर्णय नाही. शासनाच्या नियमानुसार दर चार वर्षांनी घरपट्टीमध्ये वाढ केली जाते. प्राप्त माहितीनुसार श्रीरामपूर नगरपालिकेने गेल्या ११ वर्षांपासून घरपट्टी संदर्भात वाढीचा निर्णय घेतलेला नाही.

घरपट्टी बाबत श्रीरामपूर नगरपालिकेने फेरसर्वेक्षणाचे काम एजन्सी द्वारे केले. अनेक ठिकाणी संपूर्ण पडताळणी न करता मनमानी मोजमाप करण्यात आले. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक



बोजा पडला आहे. सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या एजन्सीला कोट्यवधी रुपयांचे पालिकेने टेंडर दिले. मात्र सर्वेक्षण करताना प्रत्येक मालमत्तेची योग्य तपासणी झाली नाही. एजन्सीद्वारे मालमत्ते संदर्भात फेरसर्वेक्षण करताना नगरपालिकेचा कर्मचारी बरोबर असणे आवश्यक होते. शहरात अनेक मालमत्ता जुन्या आहेत. काहींमध्ये बदल झाले आहे. मात्र जुने–नवे असे कोणतेही निकष न लावता काही ठिकाणी सरसकट घरपट्टी आकारण्यात आली. हा सरसकट अन्याय आहे . त्यामुळे घरपट्टीची आकारणी नियमबद्ध, पारदर्शक आणि न्याय्य पद्धतीने करावी अशी मागणी छल्लारे यांनी नागरिकांच्या वतीने केली आहे.

कोपरगावमध्ये आमदार आशुतोष काळे यांनी वाढीव घरपट्टीला स्थगिती मिळवून दिली आहे. श्रीरामपूरचे आमदार हेमंत ओगले यांनी याबाबत मौन बाळगले आहे. आमदार ओगले पालिकेने लादलेल्या अवाजवी घरपट्टी संदर्भात काय भूमिका घेतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले असल्याचे छल्लारे म्हणाले.

# खा. वाकचौरेंना मतदारसंघात फिरू देणार नाही

## शिवसेनेचे सुहास वहाडणे यांचा संतप्त इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षांतर करून मतदारांचा आणि शिवसेनेचा विश्वासघात केला आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी गद्दारी करणाऱ्या वाकचौरेंना येणाऱ्या काळात जनता धडा शिकवेलच, पण त्यांना शिर्डी लोकसभा मतदारसंघात फिरू देणार नाही, असा संतप्त इशारा शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख सुहास वहाडणे यांनी दिला आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सुहास वहाडणे यांनी खासदार वाकचौरे यांच्या राजकीय भूमिकेवर तीव्र शब्दांत प्रहार केला. 'स्वार्थासाठी मतदारांशी गद्दारी' केली. याबाबत सुहास वहाडणे म्हणाले की, ''खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी केवळ स्वतःच्या फायद्यासाठी आणि स्वार्थासाठी पक्षांतर केले आहे. यापूर्वी जेव्हा त्यांनी काँग्रेसमध्ये पक्षांतर केले होते, तेव्हा शिर्डीच्या चोखंदळ मतदारांनी त्यांचा पराभव करून त्यांना त्यांची जागा दाखवून दिली होती. मात्र, भूतकाळातील चुका विसरून मागील लोकसभा निवडणुकीत त्यांना पुन्हा शिवसेनेत प्रवेश मिळावा, यासाठी मी स्वतः आणि सर्व सच्चा शिवसैनिकांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे जाहीर आग्रह धरला होता. आमच्या आग्रहामुळेच उद्धव ठाकरे यांनी वाकचौरेंना उमेदवारी दिली. मतदारसंघातील जनतेने आणि शिवसैनिकांनी उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून वाकचौरेंना मोठ्या मताधिक्याने निवडून दिले. मात्र, खासदार होताच त्यांनी पुन्हा एकदा 'ठाकरे शिवसेनेशी' गद्दारी करत पाठीत खंजीर उपसला,'' असा आरोप वहाडणे यांनी केला.

हा केवळ पक्षाचा नव्हे, तर शिर्डी मतदारसंघातील तमाम जनतेचा विश्वासघात आहे, असे सांगत वहाडने पुढे म्हणाले, ''या गद्दारीसाठी जनता आणि सच्चा शिवसैनिक त्यांना कधीही माफ करणार नाहीत. येणाऱ्या काळात ते मतदारसंघात आल्यास त्यांना तीव्र विरोध केला जाईल, तसेच त्यांना जाब विचारून शिर्डी लोकसभा मतदारसंघात फिरू दिले जाणार नाही. असाया इशाऱ्यामुळे शिर्डी लोकसभा मतदारसंघातील राजकीय वातावरण चांगलेच तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# श्रीरामपूर व नेवासा तालुक्यात मोसमातील पहिल्या दमदार पावसाची हजेरी

## बळीराजा सुखावला पेरणीला वेग येण्याची शक्यता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या कडक उन्हाच्या चटक्यानंतर, रविवारी सायंकाळी श्रीरामपूर आणि नेवासा तालुक्यांतील विविध भागांत पावसाने जोरदार हजेरी लावली. मोसमातील हा पहिलाच चांगला पाऊस असल्याने उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला असून, शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे.

रविवारी दुपारपासूनच परिसरात कमालीचा उन्हाचा तडाखा जाणवत होता. मात्र, सायंकाळच्या सुमारास हवामानात अचानक बदल झाला आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाला सुरुवात झाली. तालुक्यातील बेलापूर, उक्कलगाव, गळनिंब आणि पढेगाव यांसह आजूबाजूच्या गावांमध्ये पावसाने चांगलीच फटकेबाजी केली. राहुरी तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागात पावसाने एक तास आधीकवेळ हजेरी लावली होती.

दुसरीकडे, नेवासा तालुक्यातील पाचेगाव, बेलपिंपळगाव आणि पुनतगाव परिसरात तसेच पानेगाव, करजगाव, खुपटी, या पूर्व भागात

**गोदाकाठच्या खानापूर, भामाठाण, कमालपूर, घुमनदेव, माळवाडगांव, मुठेवाडगांव, परिसरात आद्रा नक्षत्राचा पहिलाच समाधानकारक पाऊस पडल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण दिसून आले.कडकडाट शांत वातावरणात या पावसाने शेतकऱ्यांना सुखद धक्का दिला.**

**खरिप पेरणी योग्य अंदाज आज सोमवारी समजेल. तरी कपाशी लागवडीस मात्र जोमाने सुरूवात होईल.**

रविवारी सायंकाळी पावसाने दमदार हजेरी लावली. पहिल्याच मोठ्या पावसामुळे रस्त्यांवर ठिकठिकाणी पाण्याचे डबके साचले होते.चालू मोसमातील हा पहिलाच मोठा आणि आश्वासक पाऊस असल्याने शेतकरी बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या पावसामुळे आता खरीप हंगामातील शेतीच्या कामांना वेग येणार असून, बळीराजाच्या चेहऱ्यावर हसू फुलले आहे.पावसाने जोरदार हजेरी लावल्याने उघडीप झाल्यावर पेरणीला वेग येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# नेवासा तालुक्यामध्ये भाजपच्या वतीने गाव तिथे जनसंपर्क अभियान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवास :** भारतीय जनसंघाचे संस्थापक श्री श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करुन नेवासा तालुक्यातील प्रत्येक गावात ''गाव तिथे भाजपचे जनसंपर्क अभियान सुरू करण्यात आले.यावेळी भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी,प्रदेश सचिव निरंजन डहाळे, जेष्ठ नेते अरविंद मापारी यांच्या हस्ते भाजपचा झेंडा दाखवून जनसंपर्क अभियानाची सुरुवात करण्यात आली.

अभियानाच्या पहिल्या टप्प्यात नेवासा शहरातील प्रत्येक प्रभागातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्त्यांशी संपर्क करण्यात येणार आहे त्यानंतर तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन जुन्या नव्या भाजपा कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्या व गावातील अडीअडचणी जाणून त्या सोडविण्यासाठी ना. राधाकृष्णजी विखे पाटील व युवा नेते माजी खासदार सुजयदादा विखे पाटील यांच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याची माहिती अभियानाचे संयोजक मनोजआण्णा पारखे यांनी दिली

यावेळी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी,युवा मोर्चा तालुकाध्यक्ष महेश नवले,माजी नगरसेविका डॉ निर्मला सांगळे यांनी या जनसंपर्क अभियानास शुभेच्छा दिल्या व देव देश धर्मासाठी व तरुणांच्या विकासासाठी भारतीय जनता पार्टीमध्ये काम करण्यास इच्छुक असलेल्या तरुणांनी संपर्क साधावा असे आवाहन यावेळी तालुक्यातील युवकांना करण्यात आले. यावेळी भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस निखिलगुरू जोशी,भाजपा शहर उपाध्यक्ष राजेश कडु, रितेश कराळे,गोपीनाथ माकोणे,विलास बोरुडे, माजी शहराध्यक्ष रोहित पवार,शंकर कणगरे,सरचिटणीस आप्पा गायकवाड,किशोर भांगे,अंकुश भणगे,युवा मोर्चाचे व्यंकटेश साळुंके,रोहित लष्करे,श्रीराम लष्करे,नितीन शिंदे,मुनीर शेख, प्रकाश जाधव यांच्यासह असंख्य भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# ह.भ.प. प्रथमेश बोर्डे महाराज यांचा नाभिक महामंडळाकडून जाहीर सत्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्था (राहाता) चे विद्यार्थी ह.भ.प. प्रथमेश भगवान बोर्डे यांची पहिली कीर्तन सेवा नुकतीच पार पडली.अवघ्या पहिल्याच कीर्तनात त्यांनी आपल्या सुश्राव्य वाणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या दैदिप्यमान यशाबद्दल आणि नाभिक समाजाचे भूषण ठरल्याबद्दल श्रीरामपूर शहर व तालुका नाभिक महामंडळाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला, तसेच त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.ह.भ.प. प्रथमेश बोर्डे हे उक्कलगाव येथील नाभिक महामंडळाचे मार्गदर्शक शिवाजी तान्हाजी बोर्डे व दिलीप अंबादास बोर्डे यांचे नातू, तर श्रीरामपूर तालुका नाभिक महामंडळाचे अध्यक्ष प्रशांत पांडुरंग बोर्डे यांचे पुतणे आहेत.

**पहिल्या कीर्तन सेवेचे सर्वत्र कौतुक**

त्यांच्या या यशाचे बोर्डे परिवारासह संपूर्ण नाभिक समाजात आनंदाचे वातावरण आहे. या विशेष सत्कार सोहळ्याप्रसंगी नाभिक महामंडळाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पांडुरंग वाघमारे, बाबासाहेब अहिरे,कैलास भागवत, चांगदेवराव जाधव, पोपटराव वाकचौरे, सुहास भागवत या सर्वच मान्यवरांच्या हस्ते ह.भ.प. प्रथमेश महाराज यांना सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी प्रथमेशने अत्यंत कमी वयात वारकरी संप्रदायाचा वारसा आत्मसात करून समाजाचे नाव उंचावले आहे. त्याचा हा गौरव संपूर्ण युवा पिढीसाठी प्रेरणादायी आहे. अशा भावना याप्रसंगी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या. या कौतुक सोहळ्याबद्दल बोर्डे परिवाराने सर्व समाजबांधवांचे व नाभिक महामंडळाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# निर्धोक परीक्षा का होत नाहीत? प्रशासनाचा धाक नाही!

नीट परीक्षेचे पेपर फुटले, टीईटी परीक्षेचे पेपर फुटले, तर एमपीएससीच्या परीक्षांचे वेळापत्रक वारंवार बदलले जाते. याचा सर्वाधिक फटका स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना बसतो. अनेक वर्षांची मेहनत, आर्थिक खर्च आणि मानसिक ताण यामुळे विद्यार्थ्यांचे आयुष्यच विस्कळीत होते. मात्र, या गंभीर प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्याऐवजी सरकार वेळापत्रक बदलण्यापुरतेच मर्यादित राहते. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याचा हा प्रकार तातडीने थांबणे आवश्यक आहे.

परीक्षा होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका फुटतात आणि हजारो विद्यार्थ्यांच्या कष्टांवर पाणी फिरते. पालकांनी पाहिलेली स्वप्ने चुराडा होतात. स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटणे हा जणू नित्याचाच प्रकार बनला आहे.

यामागील प्रमुख कारण म्हणजे दोषींना कायद्याचा धाक उरलेला नाही. नियमांचे उल्लंघन करूनही कठोर शिक्षा होत नाही, अशी मानसिकता निर्माण झाल्याने हे प्रकार वारंवार घडत आहेत.




सरकारचा आणि प्रशासनाचा धाक असेल, तर कोणीही असे नियमबाह्य कृत्य करण्याचे धाडस करणार नाही. मात्र, हा धाक निर्माण करणार कोण, हा खरा प्रश्न आहे.

देशाचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांनी आपल्या कार्यकाळात असा दरारा निर्माण केला होता की, मोठमोठे नेतेदेखील निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन करण्यास घाबरत होते. अपात्र ठरण्याची आणि राजकीय कारकीर्द संपुष्टात येण्याची भीती त्यांच्या मनात होती. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत शिस्त आणि पारदर्शकता आली होती.

मुंबई पोलिसांचे माजी आयुक्त जे. एफ. रिबेरो यांच्या कार्यकाळात गुन्हेगारी जगतात पोलिसांचा मोठा धाक होता. त्याचप्रमाणे, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारताच कृत्रिम दूध तयार करणारे, भेसळयुक्त अन्नपदार्थ विकणारे आणि औषध क्षेत्रातील गैरप्रकार करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

नमन श्री. पद्माकर शिंपी मो.९४२३७८५८७४

जेव्हा एखाद्या अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीमुळे एवढा प्रभाव निर्माण होऊ शकतो, तेव्हा संपूर्ण सरकारी यंत्रणा ज्यांच्या हातात आहे त्या मंत्र्यांचा आणि सरकारचा प्रश्नपत्रिका फुटविणाऱ्या टोळ्यांवर धाक का नाही? त्यामुळे ''कुठेतरी काहीतरी गडबड आहे'' असा सर्वसामान्यांचा समज अधिक बळकट होत आहे.

स्पर्धा परीक्षा आणि नीटच्या प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची स्वप्ने उद्ध्वस्त झाली आहेत. काही विद्यार्थ्यांनी नैराश्यातून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. त्यांच्या कुटुंबांचे झालेले नुकसान सरकार कशाने भरून काढणार?

भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे आणि लोकप्रतिनिधींची धक्कादायक विधाने आज सर्वसामान्य नागरिक दूरदर्शनवर पाहत आहेत. इतक्या उघडपणे गैरव्यवहार होत असतानाही संबंधित मंत्री, अधिकारी आणि संपूर्ण शासन व्यवस्था असहाय्य असल्याचे चित्र दिसत आहे. ही परिस्थिती लोकशाहीसाठी आणि देशाच्या भवितव्यासाठी अत्यंत चिंताजनक आहे.

प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटनांवर केवळ चौकशी समित्या नेमून भागणार नाही. दोषींवर जलदगती न्यायालयांत खटले चालवून कठोर शिक्षा देणे, परीक्षा व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि जबाबदार अधिकाऱ्यांनाही उत्तरदायी धरणे ही काळाची गरज आहे. अन्यथा गुणवंत विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास कायमचा उडण्याची भीती आहे.

# आज शिर्डीत उद्धव ठाकरे ची तोफ धडाडणार,

## खा वाकचौरेच्या गद्दारीचा हिशोब मोडणार

**अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शिवसेने तून पक्षांतर करून शिंदे सेनेत गेलेल्या खासदारांच्या मतदार संघात जनतेची माफी मागण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे शिर्डीत येत असून त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे . त्यांचे समवेत खा संजय राऊत खा .अनिल देसाई खा .अरविंद सावंत खा राजाभाऊ वाजे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे

राज्याच्या राजकारणात उलथापालथ झाल्या नंतर ठाकरे गटाचे सहा खासदार शिंदे सेनेत प्रवेश केला होता . त्या पार्श्वभूमीवर ठाकरे यांचा हा दौरा महत्व पूर्ण ठरणार असून ते नेमके कुणावर निशाना साधतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .शिवसेना पक्षप्रमुख द्धव ठाकरे यांची आज शिर्डी लोकसभा मतदारसंघात जाहीर सभा होत असून, या दौऱ्यामुळे राजकीय वातावरण प्रचंड तापले आहे. पक्षांतर करणाऱ्या खासदार सदाशिव लोखंडे यांच्यासह महायुती सरकारवर या सभेत जोरदार हल्लाबोल होण्याची शक्यता आहे . पक्षाशी गद्दारी करून शिंदे गटात गेलेल्या खासदारांच्या मतदारसंघात जनतेची माफी मागण्यासाठी हा दौरा आयोजित केला आहे. शिवसेनेतून बाहेर पडलेल्या लोकप्रतिनिधींवर निशाणा साधत उद्धव ठाकरे शिवसैनिकांमध्ये नवा उत्साह भरणार आहेत. राज्यातील सत्तासंघर्ष आणि बदललेल्या राजकीय समीकरणांनंतर ठाकरे नेमका कोणावर आणि कसा निशाणा साधतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे . सभेचे गांभीर्य आणि दोन्ही गटांतील संभाव्य राजकीय तणाव पाहता पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत.अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी स्वतः पोलीस ताफ्यासह साकुरी येथील सभास्थळाची आणि व्यासपीठाची प्रत्यक्ष पाहणी केली आहे.कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये आणि कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी त्यांनी आयोजकांना आणि सुरक्षा यंत्रणेला योग्य त्या सूचना दिल्या आहेत.शिर्डी, राहाता आणि साकुरी परिसराला छावणीचे रूप आले असून, चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.अहिल्यानगर जिल्ह्यात ही सभा आगामी काळातील जिल्ह्याच्या आणि राज्याच्या राजकारणाला नवी कलाटणी देणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे .

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# वारी कान्हेगाव पुलाची उभारणी ही आश्वासनपूर्ती अन् विकासाची पायाभरणी : आ.आशुतोष काळे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव विधानसभा मतदार संघात बारा वर्षांपूर्वी जे लोकप्रतिनीधी लाटे मुळे निवडून आले त्यांना विकास कामे करता आली नाहीत. त्यामुळे वारी कान्हेगाव पुलाचे काम रखडले अन रस्ते खड्ड्यात गेले. त्यामुळे या महत्वाच्या गावाची अवस्था बेटा सारखी झाली होती. मला लोकप्रतिनीधी म्हणून संधी मिळताच सुमारे वीस कोटी रूपये निधी मिळवून येथील पुलाचे काम करून दाखवीले. या गावाला जोडणारे चारही बाजूंचे रस्ते भक्कम केले. एका अर्थाने आपण माजी आमदार अशोकराव काळे यांचे स्वप्न पूर्ण केले असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

त्यांच्या पुढाकारातून गोदावरी नदीवर वारी कान्हेगाव येथे उभारलेल्या पुलाच्या लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रामनाथजी कारवा होते. यावेळी सोमय्या केमिकल्सचे कार्यकारी संचालक सुहास गोडगे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रवीण शिंदे, संचालक सुधाकर रोहम, दिलीपराव बोरनारे, प्रशांत घुले, श्रावण आसने, सुरेश जाधव, जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, पंचायत समितीचे माजी सदस्य मधुकर टेके, गौतम बँकेचे उपाध्यक्ष विजयराव रक्ताटे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वारी येथे आमदार आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यातून मिळालेल्या बंदिस्त व्यायाम शाळेचेही लोकार्पण त्यांच्या हस्ते झाले. पोलिओ केंद्रावर आलेल्या बालकांना पोलिओ डोस देऊन या मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. काळे म्हणाले, स्व.कर्मवीर शंकरराव काळे साहेब यांचे संसदेतील मित्र केंद्रीय रस्ते राज्यमंत्री मुनी यप्पा यांच्या सहकार्याने माजी आमदार अशोकराव काळे यांनी २००४ ते २०१४ या दहा वर्षात विरोधी पक्षाचे आमदार असतांना देखील गोदावरी नदिवर पुलांची मालिका उभारली.

त्यात धारणगाव-कुंभारी, चास नळी, कोपरगाव शहर व बेट,राज्य मार्ग ७ वरील देर्डे फाटा, तसेच सावळीविहीर-भरवस रस्त्यावरील सातमो-याजवळ, झगडे फाटा येथे, धामोरी रस्त्यावरील कुर्ला नाल्यावरील पूल अशा अनेक छोट्या मोठ्या पुलांचा समावेश आहे. त्यावेळी मागे राहिलेला वारी कान्हेगावचा पुल आता पूर्ण झाला. चाळीस वर्षांपासून प्रलंबीत महत्वाचा प्रश्न सुटला. येथील सबस्टेशनची क्षमता पाच एमव्हीएवरून दहा एमव्हीए केली. शेतीला आणि घरगुती वीज ग्राहकांना देखील पुर्ण दाबाने वीज मिळू लागली. श्रीरामेश्वर देवस्थानला ‘क’ वर्ग दर्जा मिळवून देवून विकास कामांना ६५ लाख रूपयांचा निधी दिला.

यावेळी गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्टचे संचालक विजयराव थोरात, जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे संचालक महेश लोंढे, नामदेव जाधव, वाल्मिक जाधव, नवनाथ जाधव, रावसाहेब टेके, सरपंच सौ.योगिताताई जाधव, उपसरपंच विजयराव गायकवाड, आदी मान्यवरांसह वारी, कान्हेगाव, सडे, शिंगवे, पुणतांबा, भोजडे आदी गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

> मी विकास कामांना प्राध्यान्य देणारा आमदार आहे. निव्वळ बडबड करून नादी लावणारा नाही. मतदार संघाच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी मिळविण्याचा माझा ध्यास आहे. गेल्या सहा वर्षात आपण माझे काम पाहिले आहे. काम करतो त्याच्या पाठीशी उभे रहा. त्यांना दिले तसे पस्तीस वर्ष मला द्या एकही विकास काम शिल्लक ठेवणार नाही. एक मॉडेल मतदारसंघ म्हणून कोपरगावची ओळख निर्माण करीन.
> **आमदार आशुतोष काळे**

## द•ख•ल

## शनिशिंगणापूरच्या महाद्वारात विशेष पल्स पोलिओ बूथ



**विजय खंडागळे | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत जगप्रसिद्ध श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे आरोग्य विभागाच्या वतीने शनि मंदिराच्या महाद्वारात विशेष पल्स पोलिओ लसीकरण बूथ उभारण्यात आला. सुट्टीच्या पार्श्वभूमीवर देशातील विविध राज्यांसह विदेशातूनही मोठ्या संख्येने भाविक शनिदर्शनासाठी आले होते. या संधीचा लाभ घेत महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषद आरोग्य विभागाने भाविकांसोबत आलेल्या बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचा डोस देत आरोग्यसेवेचा प्रभावी उपक्रम राबविला. यावेळी शनि मंदिराच्या महाद्वारात सुमारे ४०० बालकांना मोफत पोलिओ डोस देण्यात आला. या विशेष पल्स पोलिओ बूथचे उद्घाटन शनिशिंगणापूरचे पोलीस पाटील सयाराम बानकर यांच्या हस्ते करण्यात आले. मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सुनील वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्यसेवक अर्जुन बुशिंगे, आशा सेविका विजया कासार, स्वाती डिके, भक्ती बानकर तसेच अन्य आरोग्य कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

## दशक्रिया विधीनिमित्त बेल वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**श्रीरामपूर** : जमनाबाई राजाराम मोरे यांच्या दशक्रिया विधीनिमित्त पर्यावरणाचा संदेश देत बेलाच्या झाडाचे वृक्षारोपण करून पर्यावरणपूरक उपक्रम रविवारी (दि. २८ जून) सकाळी भैरवनाथमळा, सुरेगाव, ता. श्रीगोंदा, येथे पार पडला. यावेळी निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य तसेच सर्व पर्यावरणप्रेमी यांच्या वतीने दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पर्यावरणपूरक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे राज्याध्यक्ष प्रमोद मोरे यांनी आपल्या शेतामध्ये बेलाच्या वृक्षाचे वृक्षारोपण करून प्रत्येक स्मृती वृक्षरूपी जिवंत राहो हा समाजाला प्रेरणा देणारा संदेश दिला. व दशक्रिया विधी निमित्त एक अनोखा पायडा पाडला. या कार्यक्रमास सचिव वनश्रीताई मोरे गुणवरे, प्रा. संजय लाकडझोडे, सरपंच बापुराव ढवळे, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब करंजुले, उपाध्यक्ष तुकाराम अडसूळ, सहसचिव डॉ. नानासाहेब गोफणे, राज्य मीडिया प्रमुख प्रा. चंद्रकांत भोजने, प्रा. भारत उगाडे, प्रवीण गुणवरे, वंदना भोजने, सचिन वाळके, शिवाजी गुंजाळ, अमोल गाडगे तसेच राज्यभरातील पर्यावरणप्रेमी, ग्रामस्थ व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उंबरी-बाळापूर येथे प्रवरा कृषी महाविद्यालयाच्यावतीने शेतकरी चर्चासत्र



**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत लोणी येथील कृषी महाविद्यालयाच्या वतीने मौजे उंबरी-बाळापूर (ता. संगमनेर) येथे शेतकरी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. शेतकऱ्यांना आधुनिक शेती, पशुपालन आणि दुभत्या जनावरांच्या व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

प्रगतशील शेतकरी रवींद्र भुसाळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चासत्रास संपत भुसाळ, डॉ. निलेश शिंदे, हनुमंता सारबंदे, संदीप बाम्हणे, राहुल उंबरकर, विशाल निर्मळ, चंद्रकांत उंबरकर, शरद बाम्हणे, अण्णासो निर्मळ, विजय डोखे, सुरेश शिंदे, सोमनाथ बाम्हणे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रा. डॉ. गोरक्षनाथ अंत्रे यांनी दुभत्या जनावरांमधील आहार व रोग व्यवस्थापन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. योग्य चारा व्यवस्थापन, संतुलित आहार आणि वेळेवर रोग प्रतिबंधक उपाययोजना केल्यास दूध उत्पादनात लक्षणीय वाढ होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

# लोडशेडिंगच्या नावाखाली महावितरणचा भोंगळ कारभार

## निंभेरे-तुळापूर परिसरातील नागरिक त्रस्त

**सोमनाथ डोळे | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : राहुरी तालुक्यातील निंभेरे आणि तुळापूर परिसरात महावितरण कंपनीच्या ढिसाळ नियोजनाचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. लोडशेडिंगच्या नावाखाली सुरू असलेल्या अनियमित आणि लहरी वीजपुरवठ्यामुळे या परिसरातील नागरिक कमालीचे त्रस्त झाले असून, महावितरणच्या या भोंगळ कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सध्या शेतीसाठी दिवसाच्या वेळेत केवळ ६ तासांचा वीजपुरवठा मंजूर आहे. मात्र, त्यातही वारंवार खंड पडत आहे. त्यात भर म्हणून रात्री १ वाजेपर्यंत लोडशेडिंगचे कारण पुढे करत वीज बंद ठेवली जाते.

धक्कादायक बाब म्हणजे, या काळात घरगुती वापरासाठीचा सिंगल फेज वीजपुरवठाही पूर्णपणे बंद केला जात असल्याने ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी संपूर्ण अंधाराचे साम्राज्य पसरत आहे. निंभेरे-तुळापूर परिसरात सध्या बिबट्याचा वावर असल्याने नागरिक आधीच भयभीत आहेत. त्यातच रात्रीच्या वेळी वीज नसल्याने चोरांचा सुळसुळाट आणि हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्याची भीती अधिकच वाढली आहे. यामुळे ग्रामस्थांना रात्रीची वेळ जीव मुठीत धरून काढावी लागत आहे.

विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांचे हाल होत असून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे मोठे नुकसान होत आहे. तसेच घरातील ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती आणि महिलांना दैनंदिन घरगुती कामे करताना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. महावितरणच्या या मनमानी कारभारामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

### ग्रामस्थांची आक्रमक मागणी

महावितरणने लोडशेडिंगच्या नावाखाली सुरू असलेला हा भोंगळ कारभार तातडीने सुधारावा. शेतीचे वेळापत्रक काहीही असो, परंतु किमान घरगुती वापराचा सिंगल फेज वीजपुरवठा रात्रीच्या वेळी अखंडित सुरू ठेवावा, अशी आक्रमक मागणी निंभेरे-तुळापूर परिसरातील संतप्त नागरिकांनी केली आहे. मागणी पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही ग्रामस्थांकडून दिला जात आहे.

## ऋषी छल्लारे फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथे ऋषी छल्लारे फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत वह्या व पुस्तकांचे वाटप करण्यात आले. याच कार्यक्रमात अशोक सहकारी साखर कारखान्याचे नूतन व्हाइस चेअरमन आदिनाथ झुरळे तसेच भोकरची कन्या हर्षदा बनीचंद अहिरे यांनी बी.टेक. (आयटी) पदवी संपादन करून अभियंता झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम सहकार महर्षी तथा माजी आमदार भानदाजी मुरकुटे यांच्या प्रेरणेतून आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला अशोक सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा युवा नेते नीरज भैय्या मुरकुटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महेश पटारे, बाळासाहेब विधाटे, निलेश विधाटे, डी.एस. नाना पटारे, अण्णासाहेब पाटील चौधरी, सुरेश अमोलिक, दीपक झुरळे, राजेंद्र विधाटे, दीपक नवगिरे, भाऊराव सुडके, भारत छल्लारे, ओमकार छल्लारे, राहुल वाघ यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनोगत व्यक्त करताना नीरज मुरकुटे यांनी गणेश भाऊ छल्लारे यांच्या समाजोपयोगी कार्याचे कौतुक केले. विविध शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे, कोविड काळातील मदतकार्य, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, रक्तदान शिबिरे, शेतकरी व युवकांसाठी विविध उपक्रम तसेच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कार्यामुळे त्यांचे नेतृत्व समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

# अहिल्यानगर-शिर्डी महामार्गाच्या निकृष्ट कामावर अधिवेशनात आवाज उठवावा; कृती समितीची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर-शिर्डी (छक-ख-१६०) महामार्गाचे काम अत्यंत संथ गतीने व निकृष्ट दर्जाने सुरू असून त्यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या गंभीर प्रश्नावर आगामी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आवाज उठवून संबंधित प्रशासन व ठेकेदाराला जाब विचारावा, अशी मागणी 'नगर-मनमाड रस्ता दुरुस्ती कृती समिती' आणि राहुरीकरांच्या वतीने आमदार प्राजक्त तनपुरे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



महामार्गाच्या नियोजनशून्य व दर्जाहीन कामामुळे आजवर शेकडो निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला असून हजारो जण अपंग झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

महामार्गाची मूळ मंजूर रुंदी ३० मीटर असताना प्रत्यक्षात केवळ ९ मीटरचा रस्ता तयार केला जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे. रस्त्यालगतच गटारी बांधण्यात आल्याने पादचारी, दुचाकीस्वार आणि शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. राहुरी शहरातील महामार्गाची उंची वाढविल्याने अंतर्गत रस्ते खाली गेले असून पावसाळ्यात पाणी तुंबण्याची शक्यता वाढली आहे.

त्यामुळे नागरिकांसह व्यापाऱ्यांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून दुकानांमध्ये ये-जा करणे कठीण झाल्याने आर्थिक फटका बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. महामार्गावरील दुभाजकांची रुंदी अत्यंत कमी असल्याने रस्ता ओलांडताना अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच राहुरीतील सूतगिरणीसमोरील नव्याने बांधलेल्या कलव्हर्टच्या ठिकाणी अवघ्या महिनाभरातच मोठे भगदाड पडून रस्ता खचल्याने कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

कृती समितीने शहरी भागात गटारी रस्त्याच्या मध्यरेषेपासून १५ मीटर अंतरावर नेण्याची, संपूर्ण महामार्गाच्या कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची तसेच अधिवेशनात हा विषय प्रभावीपणे मांडून नागरिकांना न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र लांबे, नवनीत दरक, संतोष भुजाडी, संदीप गाडे, जनार्दन म्हसे, प्रशांत वाबळे, प्रितेश तनपुरे आणि सतीश घुले उपस्थित होते.

## पावसाने ओढ दिल्याने पुणतांबा परिसरात तीव्र चाराटंचाई; शेतकरी संकटात!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : जून महिना संपत आला तरी पुणतांबा परिसरात पावसाने अद्याप हजेरी लावलेली नाही. पावसाने प्रदीर्घ ओढ दिल्यामुळे संपूर्ण परिसरात तीव्र चाराटंचाईचे सावट निर्माण झाले आहे. यामुळे पशुधन कसे जगवायचे, असा मोठा प्रश्न स्थानिक शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. या परिसरातील ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांसाठी मक्याची कुट्टी (मुरघास) करून ठेवली होती, ती आता संपत आली आहे. तसेच सध्या परिसरात नेपिअर घास किंवा इतर कोणताही हिरवा चारा उपलब्ध नाही. चारा टंचाईवर मात करण्यासाठी दूध उत्पादक शेतकरी गायी व म्हशींसाठी ऊस खरेदी करत आहेत.

यासाठी त्यांना श्रीरामपूर येथील अशोकनगर फाट्यावर जावे लागत आहे. मात्र, मागणी वाढल्याने ऊसाचे दर ऊसाच्या वाणानुसार ३,५०० रुपये प्रति टनापर्यंत वाढले आहेत. यात भर म्हणून, छोट्या चारचाकी वाहनातून १ टन ऊस आणण्यासाठी किमान ८०० रुपये वाहतूक भाडे द्यावे लागत आहे.दूध उत्पादक दुहेरी संकटात सापडला असून एकीकडे ऊस आणि पशुखाद्याचे दर गगनाला भिडले असताना, दुसरीकडे दुधाचे खरेदी दर मात्र 'जैसे थे' आहेत. उत्पादन खर्च वाढूनही दुधाला योग्य भाव मिळत नसल्याने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.पाऊस जर आणखी काही दिवस लांबला, तर जनावरे सांभाळणे अत्यंत अवघड होणार आहे. शासनाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घ्यावी, असे शेतकऱ्यांनी सागितले.

## पुणतांबा रेल्वे स्थानकावरील ‘बायपास’ वर नवीन स्टेशन उभारा; छगनराव जोगदंड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : पुणतांबा-शिर्डी रेल्वे मार्गावर कॉर्ड लाईन (बायपास) झाल्यामुळे पुण्याकडे जाणाऱ्या जलद गाड्या पुणतांबा मुख्य रेल्वे स्थानकात न येता थेट पुढे निघून जात आहेत. त्यामुळे या मार्गावरील कॉर्ड लाईनवर एका छोट्या रेल्वे स्थानकाची व प्लॅटफॉर्मची निर्मिती करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते छगन जोगदंड यांनी राज्याचे महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

या मागणीसाठी लवकरच ग्रामस्थांचे एक शिष्टमंडळ नामदार विखे पाटील आणि माजी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यांची भेट घेणार असल्याचे जोगदंड यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. मात्र'जंक्शन'चा दर्जा फक्त नावालाच आहे. गेल्या आठवड्यापासून बहुप्रतीक्षित पुणे-शिर्डी जलद रेल्वे गाडी सुरू झाली आहे. मात्र, पुणतांबा रेल्वे स्थानकावर या गाडीला थांबा नसल्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. दोन वर्षांपूर्वी पुणतांबा-शिर्डी मार्गावर कॉर्ड लाईन तयार करण्यात आली, ज्यामुळे पुण्याकडे जाणाऱ्या गाड्या पुणतांबा स्टेशनला वळसा न घालता सरळ निघून जातात. पुणतांबा रेल्वे स्थानकाला 'जंक्शन'चा दर्जा मिळालेला असला, तरी प्रत्यक्षात येथे केवळ दोनच गाड्या थांबतात.

त्यामुळे पुणतांबेकरांना आपल्या डोळ्यादेखत गाड्या जाताना पाहाव्या लागतात, पण प्रवासाचा लाभ घेता येत नाही. या परिस्थितीमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. यावेळी, ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या असून, पुणतांबा-शिर्डी कॉर्ड लाईनवर (बायपास) तातडीने एका छोट्या रेल्वे स्थानकाची (हाल्ट स्टेशन) निर्मिती करावी,प्रवाशांच्या सोयीसाठी तिथे प्लॅटफॉर्म उभारण्यात यावी, नवीन स्टेशनवर तिकीट बुकिंग खिडकी (तिकीट काउंटर) सुरू करण्यात यावे.

या लोकहितार्थ मागण्यांचे निवेदन लवकरच विखे पाटील पिता-पुत्रांना देण्यात येणार असून, रेल्वे प्रशासनाने यावर सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलनाचा पवित्रा घेण्याचे संकेतही ग्रामस्थांकडून मिळत आहेत.

### शेतकऱ्यांच्या त्यागाची विटंबना ?

पुणतांबा-शिर्डी रेल्वे मार्ग व्हावा, म्हणून स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या मौल्यवान जमिनी दिल्या. पुणतांबा आणि शिर्डी ही दोन महत्त्वाची तीर्थक्षेत्रे एकमेकांना जोडली जावीत, हा यामागचा उद्देश होता. मात्र, आज जलद गाड्यांना येथे थांबा नसल्याने हे जंक्शन केवळ नावालाच उरले आहे, हे या भागाचे दुर्भाग्य आहे.

**छगनभाऊ जोगदंड, सामाजिक कार्यकर्ते**

### प्रवाशांना नाहक आर्थिक भुर्दंड

पुणतांबा आणि परिसरातून पुणे, मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. परंतु, थेट रेल्वे सेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना नाहक गाडी पकडण्यासाठी शिर्डी किंवा श्रीरामपूर रेल्वे स्थानकावर जावे लागते. यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहे.

# मातापूरच्या ‘न्यू इंग्लिश स्कूल’ने नवा नावलौकिक निर्माण केला; मुख्याध्यापक विजय थोरात

## विद्यार्थ्यांच्या प्रवेशात मोठी वाढ!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था, अशोकनगर संचलित न्यू इंग्लिश स्कूल, मातापूर या विद्यालयाने आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर परिसरामध्ये एक वेगळाच नावलौकिक निर्माण केला आहे.

विद्यालयाच्या याच दैदिप्यमान यशामुळे चालू शैक्षणिक वर्षात मोठ्या प्रमाणावर नवीन विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेतला असून, पालकांनी विद्यालयावर मोठा विश्वास दाखवला आहे. या विद्यालयाची निकालाची सातत्याने लागणारी उज्ज्वल परंपरा यावर्षीही कायम राहिली आहे. शाळेने १००% निकालाचा टप्पा गाठला असून, हेच या विद्यालयाचे प्रमुख ठळक वैशिष्ट्य ठरले असल्याची माहिती मुख्याध्यापक विजय थोरात यांनी दिली. केवळ अभ्यासावरच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विद्यालयाने भर दिला आहे.शाळेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले आहे.



विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शैक्षणिक सहली, स्नेहसंमेलन (गॅदरिंग) आणि विविध स्पर्धा परीक्षांचे उत्तम आयोजन केले जाते. विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.विद्यालयातील कडक शिस्त, सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांची आदर्श एकजूट आणि शाळेविषयी असणारी पराकोटीची आत्मियता यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना पालकांनी बोलून दाखवली.

या यशस्वी वाटचालीत पालक, ग्रामस्थ आणि विद्यालय यांच्यातील उत्तम व दृढ सुसंवाद कारणीभूत ठरला आहे. विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव अविनाश आदिक, सहसचिव जयंत चौधरी, माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य तसेच तथा मुख्याध्यापक विजय थोरात यांनी सर्व नूतन प्रवेशित विद्यार्थी, गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचे न्यू इंग्लिश स्कूल, मातापूर वतीने मनःपूर्वक अभिनंदन केले.

विद्यालयाला माजी विद्यार्थीचे सहकार्य लाभले.

## पान १ वरुन

## धाराशिवमध्ये ५०० कोटींचे प्लॉट खरेदी

संजय राऊतांनी केला. हा घाबरुन शिंदे गटात गेला आहे. वडिलांच्या नावाने स्थापने केलेल्या गरिबांच्या नावाने बनावट खाती उघडून कोट्यावधींचा भ्रष्टाचार केला आहे. तेरणातील भंगार विकून त्याने पैसा खाल्ला असे अनेक गुन्हे केले म्हणू या सगळ्यांची चौकशी लागली. म्हणून हा डरपोक सोंगाड्या पक्ष सोडून गेल्याचे राऊत म्हणाले. आण्ही १५, २० वर्ष एका सापाला दूध पाडले होते. पण आता त्याचा फणा ठेचायची वेळ आली असल्याचे राऊत म्हणाले.

## काष्टी बाजारातून बैल खरेदी करून परतणाऱ्या शेतकऱ्यांना मारहाण

असेही त्यांनी फोनवर सांगितले बार्शीच्या व्यापाऱ्याच्या माणसाकडून २ हजार उसने घेतले त्यातूनच आली शंका ? काष्टी येथील सुप्रसीध्द बाजारात धाराशीव येथून बैल घेण्यास आलेल्या दोन शेतकऱ्यांना बैल विकत घेण्यासाठी२ हजार कमी पडल्याने त्यांनी बार्शीच्या व्यापाऱ्याच्या माणसाकडून २ हजार उसने घेतले त्यातूनच शंका बळावली आणि त्याच्यावर दिवसाढवळ्या ट्रॅप झाल्याची जोरदार चर्चा सुरु आहे. गोरक्षकांना शेतकऱ्याच्या गाड्या अडवण्याचा काही अधिकार नाही : अरविंद कापसे संभाजी ब्रिगेड – गोरक्षकांना कोणाच्याही गाड्या अडवण्याचा अधिकार नाही त्यांना माहिती मिळाल्यावर याबाबत पोलिसांना माहिती देण्याचा नियम आहे मात्र श्रीगोंद्यात गाडी अडवून मारहाण केली जाते त्यामुळे श्रीगोड्यातील काष्टी बाजारात येण्याचा जनतेचा कल कमी झाला आहे परिणामी बाजार बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही मात्र गोरक्षणासाठी बनवलेला कायदा तालुक्यातील गोरक्षकांनी तो एकदा वाचण्याची गरज निर्माण झाली आहे.

## व्हीआयपी संस्कृतीच्या विळख्यात जेजुरी गड?

### सामान्य भाविकांच्या हक्कावर गदा; विश्वस्त समितीवर प्रश्नचिन्ह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर :** महाराष्ट्राचे कुलदैवत श्री खंडोबा यांच्या जेजुरी गडावरील व्हीआयपी संस्कृती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. सर्वसामान्य भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या सुविधांचा वापर निवडक राजकीय नेते, शासकीय अधिकारी आणि विश्वस्तांच्या निकटवर्तीयांसाठी होत असल्याचा आरोप



भाविकांकडून करण्यात येत असून, त्यामुळे संतापाची लाट उसळली आहे. भाविकांच्या म्हणण्यानुसार, रात्रीच्या वेळीदेखील विश्वस्तांच्या परवानगीने अनेक वाहने गडावर प्रवेश करतात. एका पुढाऱ्यासाठी चार ते पाच गाड्यांचा ताफा गडावर नेला जात असल्याचे प्रकार वारंवार घडत असल्याचा आरोप आहे. मात्र, दुसरीकडे सामान्य भाविकांना तासन्तास रांगेत उभे राहून दर्शनासाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने नाराजी वाढत आहे. नुकतेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते तथा माजी गृहराज्यमंत्री बाळ नांदगावकर रात्री जेजुरी गडावर दर्शनासाठी आले असता, त्यांच्या ताफ्यातील चार ते पाच वाहनांना गडावर प्रवेश दिल्याचा आरोप करण्यात आला. या घटनेनंतर जेजुरीतील सामाजिक कार्यकर्ते गिरीश झगडे यांनी संबंधित छायाचित्रे व माहिती सोशल मीडियावर प्रसिद्ध केली. त्यानंतर हा विषय राज्यभर चर्चेचा विषय ठरला. या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना बाळ नांदगावकर यांनी दिलगिरी व्यक्त केल्याचेही सांगितले जात आहे. केवळ मंत्रीच नव्हे तर आमदार खासदार, मंत्रालय प्रतिनिधि उद्योजक सिने कलावन्त यांच्या दिमतीला स्वतः विश्वस्त येत असतात यात ट्रस्टच्या हितसंबंधित लोकांना ही गडावर गाड्या नेण्ययात येते वास्तविक पाहता वृद्ध अपंग गरजू आणि ज्येष्ठ नागरिकांना हा मार्ग खुला असल्याचा फलक लिहिला जातो मात्र प्रत्यक्षात विश्वस्तांच्या अनुमतीशिवाय गाड्या सोडल्या जात नाहीत तर स्थानिकांनाही विश्वस्तांनच्या अनुमती शिवाय जाता येत नाही भाविकांचा आणखी आरोप असा आहे की, मंदिराच्या गाभाऱ्यात विश्वस्तांच्या परिचयातील व्यक्ती, राजकीय नेते, अधिकारी आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी विशेष महापूजा आयोजित केल्या जातात. या काळात सर्वसामान्य भाविकांचा प्रवेश मर्यादित होत असल्याने हजारो भक्तांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागते. परिणामी रांगेत वाद, धक्काबुक्की आणि नाराजीचे वातावरण निर्माण होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. दरम्यान, जेजुरीतील ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्ते नारायण आगलावे यांनी यापूर्वी अंध, अपंग, ज्येष्ठ नागरिक आणि गंभीर आजाराने त्रस्त भाविकांसाठी गडावर दर्शनाच्या सुविधा व नियोजनाबाबत निवेदनाद्वरे खुलासा मागितला होता. मात्र, या संदर्भात माहिती देण्यास देवस्थान विश्वस्त समितीने असमर्थता दर्शविल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सध्या सुरू असलेल्या व्हीआयपी दर्शनाच्या वादाच्या पार्श्वभूमीवर गडावरील व्हीआयपी पास व्यवस्था पूर्णपणे बंद करून सर्व भाविकांना समानतेच्या तत्त्वावर दर्शनाची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नारायण आगलावे यांनी केली आहे. स्थानिक ग्रामस्थ, मानकरी आणि सेवेकऱ्यांनाही सहज वाहन प्रवेश मिळत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे देवस्थान विश्वस्त समितीचा कारभार नेमका कोणाच्या नियंत्रणाखाली आहे? धर्मादाय आयुक्त, राज्य शासन की अन्य कोणते प्राधिकरण, असा प्रश्न भाविक उपस्थित करत आहेत.

# भरधाव कारचा धडकेत दुचाकीस्वार ठार




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरातील भरधाव कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत एकाचा मृत्यू एक गंभीर जखमी झाल्याची घटना वैजापूर शहरातील स्टेशन रोडवरील राजपाल क्लॉथ सेंटर समोर रविवारी दुपारी सव्वातीन वाजेचा सुमारास घडली.माधव मुरलीधर दळवी (वय ७७ वर्षे रा. शिवप्रतापनगर वैजापूर) असे घटनेतील मयत व्यक्तीचे नाव आहे. तर या अपघातात पुष्पलता माधव दळवी (वय ६७ वर्षे रा. शिवप्रतापनगर वैजापूर) या गंभीर जखमी झाल्या आहे. याबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार दळवी दाम्पत्य हे दुचाकी क्रमांक चक २० कृ ०३४३ ने स्टेशन रोडने राजपाल क्लॉथ सेंटर समोरून वळण घेत असताना वैजापूर शहराच्या दिशेने येणाऱ्या भरधाव कार क्रमांक चक १४ गठ ७९९८ ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दळवी दाम्पत्य हे गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकारी यांनी माधव दळवी यांना तपासून मृत घोषित केले.तर पुष्पलता दळवी यांना शहरातील खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी नाशिक येथे हलवण्यात आले आहे. अपघातानंतर कारचालक वाहनासह फरार झाला. घटनेची माहिती मिळताच वैजापूर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक आर. आर.जाधव पोलिस कॉन्स्टेबल पैठणकर, सुंदर्डे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.या प्रकरणात वैजापूर पोलिसांत वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार नोंद करण्यात आली आहे. प्रकरणाचा अधिक तपास वैजापूर पोलिस करीत आहे.

# खेळाचे मैदान सशक्त व संस्कारी पिढी घडविण्याचे प्रभावी स्थान : सुमित कोल्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे आजची तरुणाई नैराश्य, ताण-तणाव आणि मानसिक-शारीरिक समस्यांना सामोरी जात आहे. अशा परिस्थितीत मैत्री, संघभावना, नेतृत्व, शिस्त तसेच यश-अपयश स्वीकारण्याची क्षमता विकसित करणारे खेळाचे मैदान हेच तणावमुक्त, सशक्त आणि संस्कारी पिढी घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी केले.

संजीवनी रुरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सुमित कोल्हे यांच्या पुढाकारातून संजीवनी आयुर्वेद महाविद्यालयात आयोजित चार दिवसीय 'संजीवनी नेक्सस स्पोर्ट्स फेस्ट-२०२६' च्या समारोप व पारितोषिक वितरण सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन संजीवनी अकॅडमी, वैजापूरच्या संचालिका निकिता कोल्हे यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे डायरेक्टर (नॉन-अकॅडमिक) डी. एन. सांगळे, एस.जी.ओ. आसिफ सय्यद, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी निकिता कोल्हे यांनी खेळभावना, शिस्त आणि निरोगी स्पर्धात्मक वृत्ती जपत स्पर्धा यशस्वी करण्याचे आवाहन केले.

यंदाच्या महोत्सवात पंचमहाभूतांच्या संकल्पनेवर आधारित एरो अपेक्स, अॅक्वा एवेंजर्स, इग्निस इन्फर्नो आणि टेरा टायटन्स या चार संघांची निर्मिती करण्यात आली होती. क्रिकेट, व्हॉलीबॉल, दोरीखेच, रिले, कॅरम, बॅडमिंटन, बुद्धिबळ, धावणे, पोहणे, रायफल शूटिंग आणि टेबल टेनिससह विविध मैदानी व इनडोअर स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

समारोपप्रसंगी विविध स्पर्धांतील विजेते आणि उपविजेत्या संघांसह उत्कृष्ट खेळाडूंना ट्रॉफी, पदके आणि प्रशस्तीचिन्हे देऊन गौरविण्यात आले. शिक्षणासोबत क्रीडा, संस्कार आणि नेतृत्व विकासाला समान महत्त्व देण्याच्या संजीवनी रुरल एज्युकेशन सोसायटीच्या ध्येयधोरणाचा प्रत्यय या क्रीडा महोत्सवातून पुन्हा एकदा आला.




## महंत भानुदास महाराज बोरुडे पुण्यतिथी निमित्त पारायण सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील अशोक नगर फाटा स्थित महंत भानुदास महाराज बोरुडे संस्थापित विठ्ठल रुक्मिणी आश्रम मंदिरात दिनांक एक जुलै पासून ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती आश्रमाचे उत्तराधिकारी तुकाराम महाराज कदम यांनी दिली.

गुरुवर्य महंत भानुदास महाराज गिरी यांच्या सातवी पुण्यतिथी निमित्त आश्रमात सात दिवस विविध धार्मिक कार्यांनी पुण्यस्मरण करण्यात येणार आहे त्यानिमित्त प्रसिद्ध कीर्तनकार ह भ प अभय महाराज जाधव, सोमनाथ महाराज राऊत, गोपाल महाराज कावले, संजय महाराज निथाळे, अशोक महाराज इदगे, संतोष महाराज पठारे आदींची कीर्तने दररोज दुपारी ठेवण्यात आली आहेत. मंगळवार दिनांक सात जुलै रोजी काल्याचे किर्तन गुरुवर्य प्रकाशानंद गिरीजी महाराज, श्रीक्षेत्र देवगड यांचे सकाळी नऊ ते ११ या वेळेत होणार आहे. पंचक्रोशीतील तसेच तालुक्याबाहेरील विविध भजनी मंडळ सेवा देणार आहे. तरी भाविकांनी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन तुकाराम महाराज कदम यांनी केले आहे.

## बालाजी देडगाव येथे पोलिओ लसीकरण उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथे पोलिओ लसीकरण मोहीम उत्साहात पार पडली. दिवसभरामध्ये सुमारे ३८४ बालकांचे लसीकरण करण्यात आले. उर्वरित बालकाचे लसीकरण मंगळवार, बुधवार व गुरुवारी घरी जाऊन करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आली. सकाळी बालाजी देडगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये या पोलिओ लसीकरण मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी सरपंच चंद्रकांत मुंगसे, उपसरपंच आनंद दळवी, बालाजी देवस्थानचे अध्यक्ष नवनाथ मुंगसे, हरिभाऊ मुंगसे, अरुण वांढेकर, सेवा संस्थेचे चेअरमन सागर बनसोडे, विठ्ठल क्षीरसागर, पोपट मुंगसे, विजय गोयकर नवनाथ गोयकर, सूर्यभान तांबे, ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके, पत्रकार इंनुस पठाण, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. अजित गवळी, आरोग्य सेवक औदुंबर कणसे, आरोग्य सेविका अनिता सूर्यवंशी, आशा सेविका मिना कदम, मंदाकिनी गोफणे, सीमा कोल्हे, मुक्ता काळे लिला शिंदे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



## पानोडी येथे पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा उत्साहात शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** देशभरात राबविण्यात येत असलेल्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर, संगमनेर तालुक्यातील पानोडी येथे शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओचा डोस देऊन या मोहिमेचा मोठ्या उत्साहात शुभारंभ करण्यात आला.



संगमनेर तालुका दूध संघाचे संचालक विक्रमराजे थोरात यांच्या हस्ते चिमुकल्यांना पोलिओ लस पाजून या मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी सोसायटीचे माजी व्हाईस चेअरमन कारभारी जाधव, विठ्ठल घोडेकर, आनंदा तळेकर आणि पत्रकार राजेश गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी आरोग्य सेविका लता बर्डे, आशा सेविका शोभा गायकवाड, उषा कदम आणि वंदना खंडाळे या आरोग्य कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सकाळपासूनच पालकांनी आपल्या बालकांना घेऊन लसीकरण केंद्रावर गर्दी केली होती. पानोडी ग्रामस्थांनी या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, गावातील सर्व पात्र बालकांचे लसीकरण पूर्ण करण्याचा संकल्प आरोग्य विभागाने सोडला आहे.


## CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME SAYYAD AFATAB SIKANDAR (BOARD CERTIFIACTE) ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS SAYYAD AFTAB SIKANDAR (AADHAR NO. 9967 3439 5820) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHIRDI PLACE: SHIRDI DATE : 28/06/2026


## मदर तेरेसा इंग्रजी शाळेत राजश्री शाहू महाराज व मोहरम साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** शहरातील भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेत गंगापूर राजश्री शाहू महाराज जयंती आणि मोहरम सण उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे व्यवस्थापक फादर विल्फ्रेड सल्ढाणा, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश झोजे यांच्या हस्ते राजश्री शाहू महाराज व संत मदर तेरेसा यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. इयत्ता दहावीतील विद्यार्थीनी कुमारी गौरी जाधव व अनया तुमरान या विद्यार्थ्यांनी राजश्री शाहू महाराज यांच्या




सामाजिक व शैक्षणिक कार्याची माहिती आपल्या भाषणातून दिली.अब्दुलरहमान मांझी व अंजीया सय्यद या विद्यार्थ्यांनी मोहरम या सणाविषयी माहिती दिली. तर जयान पटेल, हूजेप सय्यद व जेबा चाउस यांनी पवित्र कुराणाचे वाचन केले आणि अक्षरा जैस्वाल, आलिया पठाण व साहेबा चाऊस या विद्यार्थ्यांनी मोहरम सणाची माहिती आपल्या संभाषणातून दिली. तसेच यश पगारे, चिराग नहाटा, तेजस मिसाळ, सोहम आठरे या सर्व विद्यार्थ्यांनी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्यावर आधारित प्रेरणादायी विचारांचे सादरीकरण केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावी मधील विद्यार्थिनी कुमारी हर्षदा पारखे व कुमार स्वयम लाहुटी यांनी केले.यावेळी सर्व शिक्षक , विद्यार्थी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### शहाम्मद शेख



**राहुरी :** देवळाली प्रवरा येथील मुस्लिम समाजाचे जेष्ठ सदस्य शेख शहाम्मद दगडूभाई (वय ७६वर्षे ) यांचे हृदय विकाराने नुकतेच निधन झाले. त्यांचे मागे पत्नी, दोन मुले, दोन मुली सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. आसिफ भाई व लियाकत भाई यांचे ते वडील होत.

### मुक्ताबाई येळवंडे



**सोनई :** नेवासा तालुक्यातील श्री शेत्र शनिशिंगणापूर येथील वयोवृद्ध जुन्या पिढीतील मुक्ताबाई बाळकृष्ण येळवंडे (वय ७९) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पाश्चात पती,दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, असा परिवार आहे.सेवा निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी व शनेश्वर देवस्थानचे माजी विश्वस्त बाळकृष्ण येळवंडे यांच्या त्या पत्नी, रमेश येळवंडे व अनिल येळवंडे यांच्या त्या मातोश्री तर अक्षय येळवंडे यांच्या त्या आज्जी होत.

# भारतीय शालेय क्रीडा विश्वात नवा इतिहास

## तळागाळातील क्रीडा विकासासाठी ५० लाखांचे योगदान

**गौरव डेंगळे । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** भारतीय शालेय क्रीडा क्षेत्रासाठी भविष्यात मोठे परिवर्तन घडवून आणणारा आणि विद्यार्थी खेळाडूंच्या स्वप्नांना नवी दिशा देणारा ऐतिहासिक निर्णय नवी दिल्ली येथे घेण्यात आला. स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसजीएफआय) आणि अलुम्नी कनेक्ट इंडिया (एसीआय) यांच्यात एसजीएफआयच्या ७० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.




या करारामुळे देशभरातील शालेय स्तरावरील गुणवंत आणि होतकरू खेळाडूंना केवळ स्पर्धांपुरते मर्यादित न ठेवता शिक्षण, आर्थिक सहाय्य, मार्गदर्शन आणि दीर्घकालीन प्रोत्साहनाची संधी उपलब्ध होणार आहे. भारतीय शालेय क्रीडा व्यवस्थेला अधिक सक्षम, संघटित आणि भविष्याभिमुख बनविण्याच्या दिशेने हा करार एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.करारानुसार, एसजीएफआयच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या ५०० निवडक विद्यार्थी खेळाडूंना ओळखून त्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती, मार्गदर्शन आणि दीर्घकालीन प्रायोजकत्व उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या माध्यमातून युवा खेळाडूंना मैदानावरील कामगिरीसोबत शैक्षणिक प्रगतीलाही समान महत्त्व देण्यात येणार आहे.याशिवाय, अलुम्नी कनेक्ट इंडियाने एसजीएफआयला तळागाळातील क्रीडा विकास, खेळाडू कल्याण, प्रतिभा शोध आणि शालेय क्रीडा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी ५० लाखांचे आर्थिक योगदान दिले आहे. या निधीचा उपयोग प्रशिक्षण, क्रीडा सुविधा, प्रतिभा संवर्धन आणि खेळाडूंना अधिक संधी निर्माण करण्यासाठी केला जाणार आहे.या ऐतिहासिक सामंजस्य करारावर दीपक कुमार (आयएएस), अध्यक्ष - स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया आणि सनी भंडारकर, संचालक - अलुम्नी कनेक्ट इंडिया यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी बोलताना दीपक कुमार म्हणाले, भारतीय शालेय क्रीडेसाठी हा एक ऐतिहासिक क्षण आहे. देशातील अनेक युवा खेळाडूंमध्ये मोठी क्षमता आहे; मात्र योग्य संधी आणि आधाराची आवश्यकता असते. या भागीदारीमुळे खेळाडूंना शिक्षण आणि क्रीडा या दोन्ही क्षेत्रात पुढे जाण्यासाठी नवे व्यासपीठ मिळेल आणि देशासाठी भविष्यातील विजेते घडविण्याच्या उद्दिष्टाला बळ मिळेल.तर सनी भंडारकर यांनी सांगितले, हा उपक्रम प्रारंभी प्रायोगिक स्वरूपात सुरू होत आहे. देशभरातील गुणवंत खेळाडूंना शोधून त्यांना दीर्घकालीन सहाय्य देण्याचा आमचा प्रयत्न असेल. अपेक्षित यश मिळाल्यास हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येईल.भारतीय शालेय क्रीडा क्षेत्रात प्रतिभावंत खेळाडूंना घडविण्यासाठी शासन, संस्था आणि सामाजिक सहभाग यांचे महत्त्व वाढत असताना एसजीएफआय आणि अलुम्नी कनेक्ट इंडिया यांचे हे सहकार्य भारतीय क्रीडा विश्वासाठी प्रेरणादायी आणि परिवर्तन घडवणारे पाऊल मानले जात आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील अनेक युवा खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याची नवी संधी उपलब्ध होणार आहे.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि .२९ जून २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२६ ४५० १४४ | ९-० | १९० २८० २४४ | जोड ९१-२०-४३-८६-०७

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१२४ ४६७ १३३ | ७-४ | १३० १४९ ४४६ | जोड ७०-१४-२३-८५-४६

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१२७ ४६० ५५० | ०-७ | १६० १७९ १७५ | जोड ०१-२७-४५-३९-७६

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 5 | |

द•ख•ल

## शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर खा. श्रीकांत शिंदे यांच्याशी चर्चा

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी शिक्षक सेना, अहिल्यानगरच्या वतीने खा. श्रीकांत एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यात आली. शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी खा. शिंदे यांचे शहरात स्वागत करून शिक्षकांच्या विविध समस्या, प्रलंबित मागण्या आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली. या भेटीदरम्यान जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांना भेडसावणाऱ्या विविध प्रशासकीय अडचणी खासदारांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. शिक्षकांकडून शैक्षणिक कामांव्यतिरिक्त सातत्याने विविध अशैक्षणिक जबाबदाऱ्या सोपविल्या जात असल्याने विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होत असल्याची बाब शिक्षक सेनेच्या वतीने मांडण्यात आली. शिक्षकांना केवळ अध्यापन आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीवर लक्ष केंद्रित करता यावे, यासाठी अशैक्षणिक कामांचा भार कमी करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.



## रामवाडीत राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**अहिल्यानगर :** राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत रविवारी रामवाडी परिसरात महापालिका आरोग्य विभागाच्या माध्यमातून पोलिओ लसीकरण मोहिम उत्साहात राबविण्यात आली. लहान बालकांना पोलिओसारख्या गंभीर आजारापासून संरक्षण मिळावे आणि प्रत्येक बालकाचे शंभर टक्के लसीकरण व्हावे, या उद्देशाने कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगर शाखेच्या वतीने योगदान देण्यात आले. रामवाडी आणि परिसरातील कष्टकरी, स्थलांतरित व कामगार कुटुंबांपर्यंत प्रत्यक्ष जाऊन जनजागृती करण्यात आली. रामवाडी आरोग्य केंद्रात सकाळपासूनच आपल्या चिमुकल्यांना पोलिओचे दोन थेंब पाजण्यासाठी पालकांनी मोठी गर्दी केली होती. आरोग्य कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने लसीकरण प्रक्रिया पार पाडत प्रत्येक बालकाला सुरक्षितपणे पोलिओचे डोस दिले. दिवसभरात तीनशेपेक्षा अधिक बालकांचे लसीकरण करण्यात आल्याने ही मोहीम यशस्वी ठरली. रामवाडी आरोग्य केंद्राच्या परिचारिका रोहिणी बोरुडे व सेविका नीता उडानशिवे यांनी बालकांना पोलिओचे डोस देण्याचे काम जबाबदारीने पार पाडले.

## भोसले आखाड्यात बालकांना पोलिओचे डोस



**अहिल्यानगर :** बालकांना पोलिओसारख्या गंभीर आजारापासून सुरक्षित ठेवण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत रविवारी अहिल्यानगर महानगरपालिका, जिजामाता नागरी आरोग्य केंद्र आणि जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने भोसले आखाडा येथे विशेष लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याशिवाय रेल्वे स्थानकावर जाऊन प्रवास करणाऱ्या बालकांनाही पोलिओचे डोस पाजण्यात आले. या मोहिमेचा शुभारंभ गणेश भोसले यांच्या हस्ते झाला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, पोलिओमुक्त महाराष्ट्र आणि पोलिओमुक्त भारत हे आपले सामूहिक स्वप्न आहे. प्रत्येक पालकाने आपल्या बालकाला पोलिओचे दोन थेंब देऊन या राष्ट्रीय मोहिमेत सहभाग नोंदवावा. नागरिकांच्या सहकार्यामुळेच देशाची पोलिओमुक्तीकडे वाटचाल अधिक वेगाने होऊ शकणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास नगरसेवक प्रकाश भागानगरे, नगरसेविका सुनिताताई फुलसौंदर, मीनाताई चोपडा, संजय गुगळे, राजेंद्र कटारिया, अभय मुथा, अनिल गांधी, वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख तसेच महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



अ ब क ड उपवर्गीकरण संदर्भात पारनेर तालुक्यात सर्कल मातंग समाजाची बैठक पार पडली. सुपा या बैठकीच्या आयोजन व नियोजन सकल मातंग समाज पारनेर तालुका यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी पंढरीनाथ साळवे यांनी भूषवले व सर्व समाज बांधवांच्या मार्गदर्शनाखाली उत्साह पूर्ण वातावरणात बैठक पार पडली बैठकीत अनेक समाज बांधव व सामाजि कार्यकरते उपस्थित होता.

# धाग्याऐवजी 'झाड लावून' सौभाग्य जपूया!

## वटवृक्षांचा श्वास कोंडू नका

**दिपक खोसे । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** वटपौर्णिमेला वडाच्या झाडाला सूत किंवा नायलॉनचे धागे गुंडाळल्याने झाडाच्या सालीला इजा होते आणि अन्न-पाणी वाहून नेणाऱ्या पेशींवर दाब येऊन हे महाकाय वृक्ष हळूहळू सुकू लागतात. हाच धागा कापून वृक्षांना जीवनदान देणारे अहिल्यानगर येथील मारुतरावजी घुले पाटील कॉलेजचे कला शाखा व इतिहास विभाग प्रमुख प्रा. श्रीराम मरकड यांनी श्रद्धेला पर्यावरणाची जोड देणारा एक अत्यंत सुंदर आणि विचार करायला लावणारा संदेश दिला आहे. पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी मांडलेले महत्त्वपूर्ण मुद्दे आणि आवाहन खालीलप्रमाणे आहे.

श्रद्धेच्या धाग्यांनी कोंडतोय वटवृक्षांचा श्वास झाडांना इजा वडाच्या खोडाभोवती वर्षानुवर्षे गुंडाळले जाणारे शेकडो नायलॉन व सुती धागे कुजत नाहीत.यामुळे झाडाच्या सालीला इजा होऊन पाणी आणि अन्न वाहून नेणाऱ्या पेशींवर कमालीचा दाब येतो. दरवर्षीची मोहीम प्रा. श्रीराम मरकड हे दरवर्षी वटपौर्णिमेनंतर



कॉलेज कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने महाविद्यालयातील वडाच्या झाडाला गुंडाळलेले हे दोरे कट करून झाडांना मुक्त करतात. परंपरेत बदलाची गरज पतीच्या दीर्घायुष्यासाठी ज्या वडाची पूजा केली जाते, तोच वृक्ष जर धाग्यांमुळे सुकणार असेल तर आपण निसर्गाची हानी करत आहोत.

परंपरा टिकलीच पाहिजे,पण काळानुसार त्यात बदल होणे गरजेचे आहे.

१ कोटी महिला १ कोटी वटवृक्ष (भव्य संकल्पना) महाराष्ट्रात सुमारे एक कोटी महिला वटपौर्णिमा साजरी करतात.जर प्रत्येक महिलेने केवळ प्रदक्षिणेचे धागे गुंडाळण्याऐवजी दोरा न गुंडाळता फक्त मनोभावे प्रदक्षिणा घालावी.

किंवा एक वडाचे झाड लावले,तर एका दिवसात १ कोटी वडाची लागवड होईल. वटवृक्षाचे अद्भूत निसर्ग मूल्य वडाचे झाड हे केवळ धार्मिक प्रतीक नसून ती एक संपूर्ण जीवसृष्टी आहे २४ तास ऑक्सिजन वडाचे झाड दिवसाचे २४ तास ऑक्सिजन देते. २.५ टन कार्बन शोषण हे झाड आयुष्यभरात तब्बल २.५ टन कार्बन डायऑक्साइड शोषून घेते. नैसर्गिक वातानुकूलन वडाचे झाड तापमान कमी करते,धूळ-प्रदूषण शोषून घेते आणि हजारो पक्ष्यांना हक्काचा आसरा देते.

भूजल पातळीत वाढ याची मुळे जमिनीत खोलवर जाऊन भूजल पातळी वाढवण्यास मदत करतात.श्रद्धा मनात असावी आणि कृतीतून निसर्ग जपला जावा.वडाला धाग्यात अडकवण्यापेक्षा, वडाच्या सावलीत पुढच्या पिढीला वाढवूया.आज लावलेले एक झाड पुढील २० वर्षांत आपल्या लेकराबाळांसाठी एक मोठी 'ऑक्सिजन बँक' तयार करेल!

## टोलनाक्यावरील युवकाच्या मृत्यूची चौकशी करा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा टोलनाक्याजवळ झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे.

रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, दिलीप साळवे, कृष्णा गाडे व विलास महादेव कदम यानी निवेदन पोलीस अधीक्षकांना दिले.



निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर तालुक्यातील निमगाव टेंभे येथील वैभव विलास कदम (वय १९) हा युवक कामानिमित्त मोटारसायकलवरून जात असताना हिवरगाव पावसा टोलनाक्याजवळ भरधाव कारने धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात मोटारसायकल सुमारे २०० फूट दूर फेकली गेल्याचा दावा करण्यात आला आहे.

घटनेचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असतानाही अपघाताची निष्पक्ष चौकशी झालेली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. मृत युवकाच्या कुटुंबीयांना अद्याप समाधानकारक माहिती मिळालेली नसून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी रिपब्लिकन सेनेने केली आहे. तसेच संबंधित आरोपींना संरक्षण देण्याचा प्रयत्न झाल्यास संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## अंगणवाडी सेविकांच्या हक्कांसाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावे : ॲड. जाधव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील एकल महिला, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित व निराधार महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र धोरण राबविणे, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या हक्कांचे संरक्षण करणे तसेच सुरक्षा क्षेत्रात महिलांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची मागणी शिवसेना महिला आघाडीच्या ड. स्वाती जाधव यांच्या वतीने करण्यात आली. शनिशिंगणापूर येथे खासदार तथा शिवसेना नेते डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना महिला आघाडीच्या वतीने ड. स्वाती जाधव यांनी विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील एकल महिलांना आर्थिक स्वावलंबन, सुरक्षितता, कौशल्य विकास, स्वयंरोजगार तसेच विविध शासकीय योजनांचा प्रभावी लाभ मिळण्यासाठी स्वतंत्र सक्षमीकरण व संरक्षण धोरण राबविण्यात यावे. तसेच



अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करून त्यांना सामाजिक सुरक्षा व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. याशिवाय शासकीय, निमशासकीय, औद्योगिक, शैक्षणिक संस्था, रुग्णालये आणि इतर सुरक्षा सेवांमध्ये महिलांना सुरक्षा रक्षक म्हणून प्राधान्याने रोजगार देण्यासाठी विशेष भरती मोहीम राबवावी. महिला सुरक्षा कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण, विमा संरक्षण आणि सुरक्षित कामकाजाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून शासन स्तरावर आवश्यक पाठपुरावा करून तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी अपेक्षा शिवसेना महिला आघाडीच्या वतीने व्यक्त करण्यात आली. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये महिलांचे अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे देखील ॲड. स्वाती जाधव यांनी सांगितले.

## पल्स पोलिओ बालकाच्या निरोगी व सुदृढ भविष्यासाठी : महापौर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला रविवारी शहरभर उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. शहरातील महापालिकेच्या सात आरोग्य केंद्रांवर तसेच २२५ पोलिओ बूथ केंद्रांवर शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ लसीकरणाचा डोस देण्यासाठी पालकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. महापालिका आरोग्य विभागाने केलेल्या नियोजनबद्ध तयारीमुळे लसीकरण प्रक्रिया सुरळीत पार पडत



असल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.

कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे महापौर ज्योतीताई गाडे व महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप यांच्या हस्ते बालकाला पल्स पोलिओचा डोस देऊन मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, नगरसेविका मंगल लोखंडे, डॉ. सुधा कांकरिया, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. धनंजय कुलकर्णी, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुनील कटारिया, डॉ. दिलीप बागल, योगेश औटी, डॉ. शिल्पा पाठक, डॉ. वृषाली पाटील, डॉ. भाग्यश्री अंभिरे, डॉ. जोशी, डॉ. वृषाली आरु, संगीता दळवी, कविता खिलारी आदींसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, पल्स पोलिओचे दोन थेंब हे प्रत्येक बालकाच्या निरोगी, सुदृढ आणि सुरक्षित भविष्यासाठी अत्यंत लाभदायक आहेत. महापालिका आरोग्य विभागाने शहरातील प्रत्येक पात्र बालकापर्यंत लसीकरण पोहोचविण्यासाठी व्यापक आणि नियोजनबद्ध तयारी केली असून यंदाचे लसीकरणाचे उद्दिष्ट निश्चितपणे पूर्ण केले जाईल. आज ज्या बालकांना काही कारणास्तव लसीकरणाचा डोस मिळू शकला नाही.

## आबासाहेब काकडे यांचे कार्य 'कर्मयोगी' उपाधीला साजेसे : देशपांडे



**हातगाव :** कर्म फळांची स्वतः करिता अपेक्षा न करता समाजाच्या शैक्षणिक सामाजिक उत्थानाकरिता ध्यास घेऊन अहोरात्र झगडणारा गरिबांचा नेता म्हणजे आबासाहेब काकडे. म्हणून त्यांना मिळालेली 'कर्मयोगी ' उपाधी त्यांच्या नावापुढे शोभून दिसते आहे असे उदगार प्रसिद्ध युवा व्याख्याते बाळासाहेब देशपांडे यांनी काढले. शेवगाव तालुक्यातील कांबी हायस्कूल मध्ये कर्मयोगी आबासाहेब काकडे यांचा १०७ वा जयंती समारंभ निमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदावरून बोलत होते. या वेळी देशपांडे म्हणाले की, त्या काळातील अहिल्यानगर जिल्ह्यातील एक निष्णात वकील म्हणून प्रसिद्ध असलेल्या आबासाहेबांनी आपली वकिलीचा व्यवसाय स्वतः साठी न करता परिसरातील गोरगरीब जनतेसाठी राजकीय सामाजिक शैक्षणिक क्रांतीसाठी वापरली.

## मतदार यादी पडताळणी मोहिमेला सर्वांनी सहकार्य करावे : आ. मोनिका राजळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुर्नरीक्षण कार्यक्रम सर्वत्र सुरू झाला असून ३० जून पासून २९ जुलै २०२६ पर्यंत प्रगणकांकडून प्रत्येक घरामध्ये जाऊन मतदारांची पडताळणी होणार आहे. वन नेशन, वन इलेक्शन, वन रेशन या धोरणाच्या अंमलबजावणी साठी असा उपक्रम सुद्धा उपयोगी ठरेल. सर्वांनी पडताळणी मोहिमेला सहकार्य करण्याचे आवाहन आ. मोनिका राजळे यांनी केले. आप्पासाहेब राजळे मंगल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराज समाधान शिबिराचे पाथर्डी शहर पातळीवरील लाभार्थ्यांसाठी आयोजन करण्यात आले. यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, नगराध्यक्ष अभय आव्हाड, मंगल कोकाटे, संदीप पठाडे, मिलिंद गोवेकर, सचिन वायकर,



सर्व शासकीय विभागांचे प्रतिनिधी, एसटी आगाराचे प्रतिनिधी, बचत गटाच्या प्रतिनिधी, लाभार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ.राजळे म्हणाल्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, यांच्या कल्पनेतून व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अत्यंत प्रभावीपणे या शिबिरांचे आयोजन महसूल मंडळ निहाय होत आहे. या शिबिरांच्या माध्यमातून तालुक्यात हजारो लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

जावक क्रमांक ३५८/२०२६.

### जाहीर नोटीस

**श्रीगोंदा येथील कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा यांचे न्यायालयात**

नेमलेली तारीख -

जन्म नोंद अर्ज क्र. ३५८/२०२६

**फरजाना अब्दुल माजीद शेख (विवाहानंतरचे) फरजानाबी मुरादभाई पिरजादे (विवाहापूर्वीचे)**, रा. पाटील चौक दौंड

**विरुध्द**

**ग्राम पंचायत कोळगाव**

**नगरपरिषद श्रीगोंदा**

ता.श्रीगोंदा, जि-अहिल्यानगर

या व्दारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार श्री/**श्रीम.फरजाना अब्दुल माजीद शेख (विवाहानंतरचे) फरजानाबी मुरादभाई पिरजादे (विवाहापूर्वीचे) यांचा स्वत:चा जन्म मौजे कोळगाव ता.श्रीगोंदा** येथे झाला आहे. सदर व्यक्तीची जन्म नोंद **नगर परिषद/ग्राम पंचायत कोळगाव** ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथे आढळुन येत नाही. म्हणुन सदर व्यक्तीने जन्म नोंद होणेसाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणाला सदरचे अर्जातील नमुद व्यक्तीचे जन्म नोंद होणेबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा नेमलेल्या तारखेच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकीलासह हजर राहुन आपली हरकत दाखल करावी अन्यथा मुदतीत हरकत दाखल नाही असे समजुन सदरचे अर्जाबाबत योग्य ते आदेश केले जातील याची नोंद घ्यावी. आज दि:-१२/०६/२०२६ रोजी माझे सहीने व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसीलदार, श्रीगोंदा

जावक क्रमांक ३५६/२०२६.

### जाहीर नोटीस

**श्रीगोंदा येथील कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा यांचे न्यायालयात**

नेमलेली तारीख -

जन्म नोंद अर्ज क्र. ३५६/२०२६

**जयश्री संजय नलगे (विवाहानंतरचे नाव) जयश्री बाजीराव नलगे (विवाहापूर्वीचे नाव)**, रा. कोळगाव

**विरुध्द**

**ग्राम पंचायत लोणी व्यंकनाथ**

**नगरपरिषद श्रीगोंदा**

ता.श्रीगोंदा, जि-अहिल्यानगर

या व्दारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार श्री/**श्रीम.जयश्री संजय नलगे (विवाहानंतरचे नाव) जयश्री बाजीराव नलगे (विवाहापूर्वीचे नाव) यांचा स्वत:चा जन्म मौजे लोणी व्यंकनाथ ता.श्रीगोंदा** येथे झाला आहे. सदर व्यक्तीची जन्म नोंद **नगर परिषद/ग्राम पंचायत लोणी व्यंकनाथ** ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथे आढळुन येत नाही. म्हणुन सदर व्यक्तीने जन्म नोंद होणेसाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणाला सदरचे अर्जातील नमुद व्यक्तीचे जन्म नोंद होणेबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा नेमलेल्या तारखेच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकीलासह हजर राहुन आपली हरकत दाखल करावी अन्यथा मुदतीत हरकत दाखल नाही असे समजुन सदरचे अर्जाबाबत योग्य ते आदेश केले जातील याची नोंद घ्यावी. आज दि:-१२/०६/२०२६ रोजी माझे सहीने व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसीलदार, श्रीगोंदा

## विकासाच्या गप्पा मारण्यापेक्षा प्रत्यक्ष कामे केली : आ. जगताप

### इंदिरानगर पाणी योजनेसाठी १ कोटी ५५ लाखांचा निधी मंजूर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरात यापूर्वी कधीही एवढ्या मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली नव्हती. राज्य शासनाच्या माध्यमातून शहरातील विविध विकास प्रकल्पांसाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून त्यातून नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपीची विकासकामे मार्गी लागत आहेत. केडगाव हे शहरातील सर्वात मोठे उपनगर असून या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कायनेटिक चौक ते आरणगाव या मार्गाच्या चौपदरीकरणासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यातून या मार्गावर दुभाजक, फुटपाथ आणि पथदिव्यांची उभारणी करण्यात आली आहे.

यावेळी मनोज कोतकर यांनी केडगाव परिसरासाठी तीन पाण्याच्या टाक्या मंजूर करून



आणल्या असून त्यांची कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहेत. पुढील वीस वर्षांचा विचार करून विकासकामांचे नियोजन करण्यात आले आहे. आम्ही केवळ विकासाच्या काल्पनिक गप्पा मारत नाही.प्रत्यक्षात विकासकामे पूर्ण करण्यावर भर देत आहोत. मनोज कोतकर यांची कार्यक्षम नगरसेवक म्हणून ओळख आहे त्यांनी नागरिकांचे प्रश्न सातत्याने प्रशासनासमोर मांडले आहेत. या भागातील नागरिकांना केडगाव परिसरामध्ये दळणवळणासाठी भुयारी मार्गाची निर्मिती केली असून या कामासाठी मनोज कोतकर यांनी खा. डॉ. सुजय विखे व माझ्याकडे पाठपुरावा केला असल्यामुळेच हे काम पूर्ण झाले आहे, दौंड रोड परिसरातील लाईटचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठीही प्रयत्न केले जातील, यापूर्वी नगरसेवक कोतकर यांनी जनतेच्या लाईटच्या प्रश्नासाठी आंदोलन केले होते विद्युत विभागाने त्यांच्यावर दोन गुन्हे दाखल केले आहे जनतेच्या प्रश्नासाठी आवाज उठवणारे नगरसेवक तुम्ही निवडून दिले आहे असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

यावेळी संपत बारस्कर, नगरसेवक मयूर बांगरे, जालिंदर कोतकर, सुमित लोंढे, अजित कोतकर, संभाजी पवार, अजय चितळे, सविता पवार, सुरेखा कदम, शकीला पठाण, विजया बोठे, अलका सुपेकर, सुरेखा खामकर, मीना भापकर, अनिता बेंद्रे, सुनीता भापकर, सिताराम खामकर, संतोष कदम, शंकर भडांगे, भास्कर कराळे, रावसाहेब कातोरे, प्रकाश सुपेकर, निखिल काळे, यश भापकर, हर्षल कदम, सौरभ सुपेकर, प्रशांत लगड, नाना गायकवाड, प्रवीण वायकर, गणेश खामकर, सागर शिंदे, ओम कदम, प्रयम झरेकर, आदित्य पवार, हरिश्चंद्र शिर्के, शाहू गायकवाड आदींसह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

जावक क्रमांक ३५७/२०२६.

### जाहीर नोटीस

**श्रीगोंदा येथील कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा यांचे न्यायालयात**

नेमलेली तारीख -

जन्म नोंद अर्ज क्र. ३५७/२०२६

**परवीन रमजान शेख (विवाहानंतरचे) परवीन मुरादभाई पिरजादे (विवाहापूर्वीचे)**, रा. वारजे, माळवाडी पुणे

**विरुध्द**

**ग्राम पंचायत कोळगाव**

**नगरपरिषद श्रीगोंदा**

ता.श्रीगोंदा, जि-अहिल्यानगर

या व्दारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार श्री/**श्रीम.परवीन रमजान शेख (विवाहानंतरचे) परवीन मुरादभाई पिरजादे (विवाहापूर्वीचे) यांचा स्वत:चा जन्म मौजे कोळगाव ता.श्रीगोंदा** येथे झाला आहे. सदर व्यक्तीची जन्म नोंद **नगर परिषद/ग्राम पंचायत कोळगाव** ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथे आढळुन येत नाही. म्हणुन सदर व्यक्तीने जन्म नोंद होणेसाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणाला सदरचे अर्जातील नमुद व्यक्तीचे जन्म नोंद होणेबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा नेमलेल्या तारखेच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकीलासह हजर राहुन आपली हरकत दाखल करावी अन्यथा मुदतीत हरकत दाखल नाही असे समजुन सदरचे अर्जाबाबत योग्य ते आदेश केले जातील याची नोंद घ्यावी. आज दि:-१२/०६/२०२६ रोजी माझे सहीने व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसीलदार, श्रीगोंदा

जावक क्रमांक ३५९/२०२६.

### जाहीर नोटीस

**श्रीगोंदा येथील कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा यांचे न्यायालयात**

जन्म नोंद अर्ज क्र. ३५९/२०२६

नेमलेली तारीख -

**राजकोटिया रावजीभाई नानजीभाई**

रा. बेलवंडी बु.

**विरुध्द**

**ग्राम पंचायत बेलवंडी बु.**

**नगरपरिषद श्रीगोंदा**

ता.श्रीगोंदा, जि-अहिल्यानगर

या व्दारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार श्री/**श्रीम.राजकोटिया रावजीभाई नानजीभाई यांचा मुलगा नामे अभय रावजीभाई राजकोटिया यांचा जन्म मौजे बेलवंडी बु. ता.श्रीगोंदा** येथे झाला आहे. सदर व्यक्तीची जन्म नोंद **नगर परिषद/ग्राम पंचायत बेलवंडी बु.** ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथे आढळुन येत नाही. म्हणुन सदर व्यक्तीने जन्म नोंद होणेसाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणाला सदरचे अर्जातील नमुद व्यक्तीचे जन्म नोंद होणबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा नेमलेल्या तारखेच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकीलासह हजर राहु होऊन आपली हरकत दाखल करावी अन्यथा मुदतीत हरकत दाखल नाही असे समजुन सदरचे अर्जाबाबत योग्य ते आदेश केले जातील याची नोंद घ्यावी. आज दि:-१२/०६/२०२६ रोजी माझे सहीने व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसीलदार, श्रीगोंदा

द•ख•ल

## शिरूरच्या पिंपरखेड येथे एक लाख अठ्ठावीस हजारांच्या कॉपर केबलची चोरी

**कवठे येमाई :** पिंपरखेड (ता. शिरूर) येथील घोडनदी पात्रालगत असलेल्या पाटीलवस्ती परिसरातून अज्ञात चोरट्यांनी तब्बल १६ शेतकऱ्यांच्या इलेक्ट्रिक मोटारींच्या कॉपर केबली चोरी करून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.या प्रकरणी सोमनाथ बाळू बोंबे (वय ३३, रा. पिंपरखेड) यांनी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली आहे. दि.२६ जून २०२६रोजी सायंकाळी ५ ते २७ जून रोजी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान ही चोरी घडली. चोरट्यांनी एकूण ४,२९० फूट लांबीच्या कॉपर केबली चोरी केल्या असून, चोरीस गेलेल्या मालाची किंमत १ लाख २८ हजार ७०० रुपये इतकी आहे.या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ५९१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) व ३२४(४) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस हवालदार गवळी यांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस हवालदार मुंडे करीत आहेत. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून,पोलिसांनी या घटनेचा तात्काळ छडा लावत चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकरयांतून होत आहे.

## सासवड परिसरात आज पल्स पोलिओ मोहिमेत ९५ टक्के बालकांना डोस - डॉ गजानन अक्कमर

**माळशिरस :** राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियान २०२६ अंतर्गत आज सर्वत्र ० ते ५ वयोगटातील बालकांना दोन थेंब पाजून पोलिओ मुक्तीचे पाऊल उचलण्यात आले आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने सासवड येथील ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून दिवस भरात सुमारे ९५ टक्के बालकांना दोन थेंब पाजल्याची माहिती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ गजानन अक्कमर यांनी दिली. आज ज्या बालकांना डोस दिले नाहीत त्या सर्वांना २९ जुन ते ३ जुलै या कालावधीत घरोघरी जाऊन ही मोहीम राबवण्यात येणार असल्याचेही डॉ अक्कमर



यांनी सांगितले आज विविध ठिकाणी २२ केंद्राङरे हे अभियान पार पाडले असून तीन फिरत्या पथकाकडून वीटभट्टी, झोपडपट्टी, वाडी वस्तीवर मुलांना थेंब देण्यात आले. सासवड एस टी स्टँड व पीएमटी स्थानक या सार्वजनिक ठिकाणी देखील पोलिओ थेंब पाजण्याची सोय करण्यात आली होती. सुमारे साठहुन अधीक परिचारिका,पाच पर्यवेक्षक, अंगणवाडी ताई तसेच काही स्वयंसेवक यांच्या सहयोगातून हे अभियान पार पडल्याची माहिती देखील डॉ गजानन अक्कमर यांनी दिली. सासवड नगर पालिकेच्या नगराध्यक्षा आनंदी काकी जगताप यांनी सोपान नगर येथील केंद्रावर तर ममता विजय शिवतारे यांनी ग्रामीण रुग्णालय येथे उपस्थिती दाखवत या मोहिमेत सहभाग नोंदवला

## कान्हूर मेसाई परिसरात जोरदार पावसाची दमदार बरसात; शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित

**पाबळ :** गेल्या अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या कान्हूर मेसाई परिसरात रविवारी दुपारनंतर जोरदार पावसाने दमदार हजेरी लावली. सुमारे तासभर कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर पाण्याचे प्रवाह वाहू लागले, तर शेतशिवारात सर्वत्र पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले.यंदाच्या मान्सूनच्या



सुरुवातीपासूनच पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत होते. मात्र या दमदार पावसामुळे खरीप हंगामाला नवसंजीवनी मिळाली असून मका, बाजरी, सोयाबीन, तूर आणि इतर पिकांच्या पेरण्यांना वेग येणार आहे. पावसामुळे विहिरी, तलाव आणि ओढ्यांच्या पाणीपातळीतही वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांनाही मोठा दिलासा मिळाला. लहान मुलांनी पावसाचा मनमुराद आनंद लुटला, तर शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. परिसरातील शेतकऱ्यांनी या पावसाचे स्वागत करत, आगामी काळातही अशीच सातत्यपूर्ण पावसाची साथ मिळाल्यास खरीप हंगाम चांगला होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजा-उपमुख्यमंत्री

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती:** 'पोलिओमुक्त भारत' ही आपली सामूहिक जबाबदारी आहे; यादृष्टीने राज्यभर राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे; पोलिओवर मात करण्याचा प्रभावी मार्ग लसीकरण आहे, त्यामुळे प्रत्येक पालकाने जबाबदारीने पुढे येऊन आपल्या पाच वर्षांखालील बालकांना जवळच्या लसीकरण केंद्रावर जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

श्रीमती पवार यांच्या हस्ते महिला शासकीय ग्रामीण रुग्णालय येथे बालकांना लसीचे दोन थेंब पाजून जिल्हास्तरीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील, जिल्हा शैल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी कल्पना पंडित, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, महिला रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बापू भोई, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनोज खोमणे आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, पोलिओमुक्त महाराष्ट्र राज्यासह भारत देशाकरिता आपल्या पाच वर्षांखालील सर्व बालकांना जवळच्या लसीकरण केंद्रावर जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, या लसीमुळे बालकाचे आयुष्य सुरक्षित आणि आनंददायी होण्यास मदत होणार आहे. निरोगी बालक, निरोगी कुटुंब आणि निरोगी महाराष्ट्र घडविण्यासाठी हातभार लावूया, चला एकत्र येऊया आणि पोलिओमुक्त महाराष्ट्राचा संकल्प अधिक बळकट करूया, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले.



# व्यसनाला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होणे चिंताजनक

## प्रकट मुलाखतीत तज्ज्ञांचा सूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:-** कोणत्याही कौटिंबिक किंवा सामाजिक समारंभास गेले असता, तुम्ही 'सोशल ड्रींक' देखील करीत नाही, हे ऐकून आश्चर्य व्यक्त करणाऱ्या आणि तुम्ही परग्रहावरून आलेले आहात, अशा नजरेने पाहणाऱ्या समाजातील तथाकथित प्रतिष्ठीत लोकांनी व्यसनाला प्राप्त करून दिलेली सामाजिक प्रतिष्ठा खेदजनक असल्याचा सूर आज तज्ज्ञांनी व्यक्त केला.

तरुण पिढीला अमली पदार्थांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी आणि समाजमनात जागृती करण्यासाठी दरवर्षी २६ जून हा दिवस जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन म्हणून पाळला जातो. यानिमित्त अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊंडेशन आणि पुण्यातील मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रातर्फे साधना साप्ताहिकाच्या सहयोगाने विशेष दीर्घ मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी गडचिरोली येथील सर्च संस्थेचे संचालक डॉ. आनंद बंग, सातारा येथील परिवर्तन व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. हमीद दाभोलकर आणि महाराष्ट्र राज्य अमली पदार्थ विरोधी कृती दलाचे अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव ( म.पो.से.) यांच्याशी मुक्ता पुणतांबेकर आणि सोनाली काळे प्रकट मुलाखतीव्दारे संवाद साधला. अमेरिकेतील




जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊंडेशन आणि पुण्यातील मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रातर्फे साधना साप्ताहिकाच्या सहयोगाने आज आयोजित विशेष दीर्घ मुलाखतीत बोलताना डॉ. हमीद दाभोलकर. यावेळी (डावीकडून) मुक्ता पुणतांबेकर, सोनाली काळे, डॉ. हमीद दाभोलकर, डॉ. आनंद बंग आणि हिंमत जाधव.

महाराष्ट्र फाऊंडेशनचे सदस्य डॉ. सुरेश तलाठी यांच्या संकल्पनेतून निवारा सभागृहात आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला होता.

यावेळी बोलताना डॉ. हमीद दाभोळकर म्हणाले की, मानसिक आरोग्य आणि व्यसन यांचा जवळचा संबंध आहे. मानसिक अस्वस्थता आल्यावर माणूस एकतर धर्माच्या किंवा व्यसनाच्या आहारी जातो. हे दोन्ही उपाय तात्पुरता दिलासा देणारे असल्याने ते दीर्घकालीन उपाय नव्हेत. व्यसनाधीनता हाच मूळात एक मानसिक प्रश्न आहे. ज्या प्रमाणे अंधश्रद्धा अज्ञानातून निर्माण होते, त्याच पद्धतीने अनेक मानसिक आजार हे व्यसनाच्या प्रभावाखालीच निर्माण होते. व्यसनाधीनतेला खतपाणी घालण्यात सेलिब्रेटी देखील तितकेच जबाबदार असून आवश्यकता नसतानादेखील ते तंबाखू आणि अल्कोहलच्या जाहीराती करतात. मूळात अंधश्रद्धा आणि व्यसन हे व्यक्तीचा विवेक मारण्याचे काम करतात. व्यसनाच्या अंमलाखाली चांगले-वाईट यात फरक करण्याचे भान व्यक्ती हरवून बसते. यावेळी बोलताना डॉ. आनंद बंग म्हणाले की, व्यसन म्हटले की, तंबाखू आणि दारू या दोन गोष्टी अधोरेखित करणे मला आवश्यक वाटते. स्त्रियांचे आरोग्य केंद्रस्थानी ठेवून १९८६ साली गडचिरोलीमध्ये आम्ही काम सुरू केले तेव्हा स्त्रियांनी आरोग्याचा प्रश्न दुय्यम ठेवत दारूबंदीला अग्रक्रम दिला. दारूमुक्ती हेच त्यांचे मुख्य धोरण होते. तत्कालीन नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हा व्यसनाच्या देखील आहारी गेला होता. कोणताही प्रश्न हिंसेने सुटत नसतो, तर त्यासाठी अहिंसेचा मार्ग अवलंबावा लागतो या एका सूत्रावर एकत्रित येत दारूमुक्तीसाठी आम्ही सातत्याने लढा दिला. सर्च सारख्या संस्थेमार्फत जिल्हाव्यापी कार्यक्रम आखून शासकीय दारूबंदी लागू केली. विळी बोलताना हिंमत जाधव म्हणाले की, व्यसनाधीनता आणि गुन्हेगारी या दोन्ही गोष्टी सोबत प्रवास करतात. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सूचनेनुसार अंमली पदार्थ विरोधी कृतीदल स्थापन करून व्यसनाधीनता मूळासकट उखडवून टाकण्याचा निर्धार केलेला आहे. या कृतीदलाचे मुख्यालय पुणे हेच असून त्याच्या अखत्यारीत राज्यात सात उपकेंद्र स्थापन करण्यात आले आहेत. व्यसनाधीनतेचा प्रश्न हा केवळ एका व्यक्तीपुरता नसून नार्को टेरीझम हा त्याचा व्यापक आयाम आहे. पारंपारिक युध्द पध्दती बदलून शत्रू राष्ट्राच्या पिढ्यान् पिढ्या व्यसनाच्या आहारी कशा जातील आणि अंमली पदार्थांच्या विक्रीतून मिळणाऱ्या पैशातूं शत्रू राष्ट्रात देश विघातक कृती कशा करता येतील, यादृष्टीने रणनिती आखली जात आहे.

## तापकीरनगर येथील रखडलेले शीव रस्त्याचे काम मार्गी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आळंदी नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ०८ मधील तापकीरनगर परिसरातील अत्यंत महत्त्वाच्या शीव रस्त्याचे काम अनेक दिवस विविध स्थानिक अडचणींमुळे रखडले होते. त्यामुळे परिसरातील नागरिकांना दैनंदिन वाहतूक, शालेय विद्यार्थ्यांची ये-जा तसेच वाढत्या वाहनांच्या वर्दळीमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी नागरिकांकडून होत होती.

आषाढी वारी नियोजन बैठकीदरम्यान उपनगराध्यक्षा सुजाताताई तापकीर आणि गटनेते सचिन गिलबिले यांनी या रखडलेल्या कामाची गंभीर दखल घेत नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे तसेच मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या निदर्शनास हा विषय आणून दिला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत संबंधित विभागाला तात्काळ काम सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

दरम्यान, कामातील अडथळे दूर करण्यासाठी उपनगराध्यक्षा सुजाताताई तापकीर आणि गटनेते सचिन गिलबिले यांनी पुढाकार घेत विविध संबंधित घटकांशी समन्वय साधला. तसेच रस्त्यालगतच्या जागा मालकांनीही विकासकामाचे महत्त्व ओळखून प्रशासनाला सहकार्य केल्याने अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले हे काम अखेर मार्गी लागले.



## कवठे येमाई येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र कवठे येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ आज रविवार दि. २८ ला सकाळी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. बालकांना पोलिओ सारख्या गंभीर आजारापासून संरक्षण मिळावे आणि पोलिओमुक्त भारताचे स्वप्न अधिक बळकट व्हावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.

या मोहिमेचा शुभारंभ कवठे येथील सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग भोर, कवठे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन श्री रितेश शहा तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य डॉ. विकास शेटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ बावस्कर, डॉ महाजन तसेच आरोग्य विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पोलिओ प्रतिबंधासाठी लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित करत प्रत्येक पालकाने आपल्या पाच वर्षांखालील बालकांना पोलिओचे दोन थेंब देण्याचे आवाहन केले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत गावातील तसेच परिसरातील सर्व बालकांपर्यंत लसीकरण पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागामार्फत विशेष नियोजन करण्यात आले असून, घरोघरी जाऊनही बालकांना पोलिओचे डोस देण्यात येणार आहेत.या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थांचे सहकार्य लाभत असून, सर्वांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जलवाहिनी प्रकल्पाचे काम केवळ ३० टक्के

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाघोली :** भामा आसखेड धरणातून वाघोली व लोहगाव परिसराला पाणीपुरवठा करण्यासाठी सुरू असलेल्या जलवाहिनी प्रकल्पाचे काम ३० महिन्यांच्या मुदतीनंतरही केवळ ३० टक्केच पूर्ण झाल्याने वाघोलीतील अनेक भागांमध्ये गेल्या दीड महिन्यांपासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. ठेकेदाराच्या संथगतीने सुरू असलेल्या कामाबरोबरच पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या नियोजनावरही नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. महानगरपालिकेने भामा आसखेड धरणातून पाणी आणण्यासाठी जलवाहिन्यांचे जाळे विकसित करणे आणि पाण्याच्या टाक्या उभारण्याचा सुमारे १७३.५५ कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. जानेवारी २०२४ मध्ये हा प्रकल्प मे. अरिहंत कन्स्ट्रक्शन कंपनीला ३० महिन्यांच्या मुदतीसाठी देण्यात आला होता. मात्र, मुदत संपत आली असताना केवळ ३० टक्के काम पूर्ण झाले आहे. जलवाहिन्या टाकण्यासाठी गावठाण परिसरातील अनेक सिमेंटचे रस्ते खोदून ठेवण्यात आले असून ते अद्याप पूर्ववत करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पावसाळ्यात चिखल, पाणी साचणे आणि वाहतुकीच्या समस्या अधिक गंभीर झाल्या आहेत. तसेच जलवाहिन्यांची चाचणी, दाब तपासणी, गळती शोधणे आणि घरगुती जोडण्या देण्याची कामेही अद्याप सुरू नसल्याने उर्वरित ७० टक्के काम मुदतीत पूर्ण होण्याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. जुन्या जलवाहिन्या काढून नव्या टाकण्याच्या प्रक्रियेमुळे गावठाण परिसर, शिवराज चौक, दत्त स्पोर्ट्स चौक, श्रीराम मंदिर चौक, हनुमान चौक, भैरवनाथ स्पोर्ट्स चौक, पाटोळे आळी, पाचारणे आळी, बुरुज आळी, जाधवराव वाडा आणि वाघमारे वस्ती या भागांतील नागरिकांना गेल्या दीड महिन्यांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. प्रभाग समिती अध्यक्ष अनिल सातव पाटील यांनी संबंधित ठेकेदारावर करारातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करून त्याला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली आहे. तसेच विलंबाबद्दल दंड वसूल करणे, अनामत रक्कम जप्त करणे आणि संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## वाघळवाडी-सोमेश्वरनगर १०० बेड रुग्णालयाच्या कामाला प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** दिवंगत लोकनेते अजित पवार यांनी बारामती विधानसभा मतदारसंघातील वाघळवाडी-सोमेश्वरनगर येथे उभारण्यात येत असलेल्या १०० बेडच्या अत्याधुनिक रुग्णालयाच्या कामासाठी काही महिन्यांपूर्वी ७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व तातडीच्या आरोग्यसेवा त्यांच्या परिसरातच उपलब्ध व्हाव्यात, हा त्यामागील प्रमुख उद्देश होता. या महत्त्वाकांक्षी रुग्णालयाच्या उभारणीच्या कामाला आता प्रत्यक्ष सुरुवात झाली असून, त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते जय अजितदादा पवार यांनी (दि:२८) रोजी वाघळवाडी येथे भेट देत कामाची पाहणी केली.



यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी कामाच्या प्रगतीबाबत सविस्तर चर्चा करून विविध बाबींची माहिती घेतली. तसेच रुग्णालयाचे काम उच्च दर्जाचे, वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावे, कामाची कोणतीही त्रुटी खपवून घेणार नाही अशा स्पष्ट सूचना त्यांनी यावेळी संबंधित यंत्रणेला दिल्या. दिवंगत लोकनेते अजित पवार यांनी पाहिलेल्या या आरोग्यसेवेच्या स्वप्नाला मूर्त स्वरूप देण्यासाठी काम वेगाने सुरू असून, हे रुग्णालय पूर्ण झाल्यानंतर बारामतीसह परिसरातील ग्रामीण नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असुन तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या उच्च उपचारसेवा वाघळवाडी येथेच उपलब्ध होणार आहे.

# बोगस डॉक्टर, बनावट औषध, अन्नधान्यात भेसळ करणाऱ्यांना 'मकोका'लावा : रवींद्र ओव्हाळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पिंपरी, पुणे :** राज्यातील बोगस डॉक्टर, बनावट औषध विक्री करणारे आणि दूध, अन्नधान्यात भेसळ करणाऱ्यांना ''मकोका'' लावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी झोपडपट्टी सेलचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रवींद्र ओव्हाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. तसे पत्र ओव्हाळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठवले आहे. या पत्रात पुढे म्हटले आहे की, शुक्रवारी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना सांगितले की, पुणे आणि पिंपरी चिंचवड मधील दापोडी, फुगेवाडी येथे मागील महिन्यात विषारी दारू पिऊन २२ नागरिकांचा मृत्यू झाला. या दारूकांडातील आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा ''मकोका'' अंतर्गत कारवाई केली जाईल. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पोलीस, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अन्न व औषध प्रशासनाकडून एकत्रित कारवाई करण्यात येईल अशी माहिती दिली. या घटनेतील सर्व आरोपींवर ''मकोका'' अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी ३० मे २०२६ रोजी रवींद्र ओव्हाळ यांनी लिखित पत्राङरे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. या घटनेची मुख्यमंत्री आणि गृहराज्यमंत्री यांनी गंभीर दखल घेतल्याबद्दल त्यांचे आभार. तसेच राज्यात गुटखा बंदी असताना देखील सर्वत्र गुटखा उपलब्ध होत आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अन्नधान्य पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिलेल्या आदेशानुसार अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर मोठ्या प्रमाणात धाडी टाकल्या आहेत. मागील तीन दिवसांपूर्वी नागपूर येथे कारवाईमध्ये काही बोगस डॉक्टर राजरोसपणे क्लिनिक सुरू करून नागरिकांवर उपचार करत असल्याचे समोर आले. तसेच अनेक ठिकाणी टाकलेल्या धाडींमध्ये बनावट औषधे तसेच दूध आणि अन्नधान्यांमध्ये भेसळ केल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे सर्वसामान्यांचा जीव धोक्यात येऊ शकतो. नागरिकांनी बोगस डॉक्टर कडून उपचार घेऊ नयेत. तसेच बनावट औषधे आणि दूध, अन्नधान्य यातील भेसळ ओळखता यावी. याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी यासाठी सरकारने ठिकठिकाणी जनजागृती शिबिर घ्यावेत. तसेच बोगस डॉक्टर, बनावट औषध उत्पादन व विक्री करणारे आणि दूध, अन्नधान्यात भेसळ करणाऱ्यांवर देखील ''मकोका'' लावावा आणि नागरिकांचे जीवन सुखकर करावे अशी मागणी रवींद्र ओव्हाळ यांनी या पत्रात केली आहे.

# 'सत्यमेव जयते फार्मर कप'चा उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते शुभारंभ : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई/ पुणे :** ''महाराष्ट्रातील दुष्काळमुक्ती आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी काम करणाऱ्या पाणी फाऊंडेशनच्या प्रयत्नांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांची सुरुवातीपासूनच मोठी साथ लाभली आहे. जलयुक्त शिवार अभियानापासून सुरू झालेले हे सहकार्य आता फार्मर कपच्या माध्यमातून विविध टप्प्यांवर शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी काम करत आहे.पाणी फाऊंडेशनतर्फे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या 'सत्यमेव जयते फार्मर कप २०२६' स्पर्धेचा भव्य शुभारंभ सोमवार, दिनांक २९ जून २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान 'वर्षा' येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडेल,'' अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २३ मार्च २०२५ रोजी फार्मर कप २०२४ मधील शेतकरी गटांना सन्मानित करताना फार्मर कप उपक्रमाचा संपूर्ण महाराष्ट्रात ३५१ तालुक्यात विस्तार करावा अशा सूचना दिल्या होत्या. मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या निर्णयानंतर महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग, ग्रामविकास मधील महिलांच्या उपजीविकेसाठी काम करणारी उमेद व पानी फाऊंडेशन यांच्या सहभागातून शेतकऱ्यासाठी जनचळवळ उभी करण्यासाठी एकत्र विविध टप्प्यावर कार्यवाही सुरू आहे.

पहिल्या टप्प्यात कृषी विभागातील १२ हजार १११ व उमेद मधील समूह संसाधन व्यक्ती (ग्रामसखी ) ३०३५९ यांचे फार्मर कप व गटशेतीचे महत्व यासाठी प्रशिक्षण घेण्यात आले. दुस-या टप्प्यामध्ये ४५ हजार १९० शेतकरी व कृषीसखी यांना फार्मर कप उपक्रमाबद्दल माहिती देण्यात आली.तिसऱ्या महत्वाच्या टप्प्यात ३६ प्रशिक्षण केंद्रावर शेतकरी व उमेद मधील समूह संसाधन व्यक्ति अशा ३२ हजार ९९३ शेतकऱ्यांचे तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण एप्रिल २०२६ अखेर पूर्ण करण्यात आले.चौथ्या टप्प्यामध्ये गटशेतीतूनच शेतकऱ्यांचे प्रश्न सुटू शकतात.शेतीचा खर्च कमी होवून पिकाची उत्पादकता वाढविता येते, कृषी विद्यापीठाच्या शेतीत प्रमाणित कार्यपद्धतीचा अवलंब केला , तर शेतकऱ्यांचा प्रवास समृद्धिकडे होईल . यासाठी शेतकरी गट बांधणी मध्ये शेतकऱ्यानी उत्कृष्ट प्रतिसाद दिला व एक पीक, एक गट अंतर्गत २५ हजार ८२३ शेतकरी गट फार्मर कप उपक्रमासाठी सज्ज झाले आहेत.पाचव्या टप्प्यामध्ये शेतकरी गटाना ज्ञान मिळावे यासाठी कृषी विद्यापीठातील शात्रज्ञ यांच्या मदतीने खरीप हंगामामधील पिकासाठी दररोज डिजिटल शेतीशाळा २५ मे २०२६ पासून सुरू करण्यात आल्या आहेत. सहाव्या टप्पयामध्ये २५ हजार ८२३ शेतकरी गट शेतीत येणाऱ्या समस्येवर मात करण्यासाठी सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ साठी सज्ज झाले आहेत, स्पर्धे साठी त्यांनी सुरुवात केली आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली कृषी विभाग या स्पर्धेला आणि पाणी फाऊंडेशनच्या उपक्रमांना पूर्ण सहकार्य करत आहे. यंदाच्या स्पर्धेतून महाराष्ट्रातील अधिकाधिक शेतकरी समृद्धीकडे वाटचाल करतील.

या उपक्रमाविषयी माहिती देताना कृषी आयुक्त सूरज मांढरे म्हणाले की, '''सत्यमेव जयते फार्मर कप' म्हणजे केवळ एक स्पर्धा नसून, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावून त्यांना आर्थिक समृद्धीकडे नेणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या उपक्रमामुळे आगामी काळात महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रातील नावीन्यपूर्ण प्रयोगांना आणि गटशेतीला मोठी गती मिळेल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी ही स्पर्धा मैलाचा दगड ठरेल,''

# भरधाव टोयोटा कारच्या धडकेत एकाचा मृत्यू ; चालकावर गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** सासवड-भिवरी रस्त्यावरील श्रीनाथवाडी, चांबळी (ता. पुरंदर) येथे भरधाव व बेदरकारपणे चालविलेल्या कारच्या धडकेत दुचाकीस्वार विशाल शाम मोहरकर यांचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. २६ जून) रात्री घडली. या प्रकरणी मृताचे भाऊ कृष्णा शाम मोहरकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कारचालक गणेश यशवंत चौलकर (वय ३८, रा. पेन कोळीवाडा, ता. पेन, जि. रायगड) याच्याविरुद्ध सासवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री सुमारे




१०.४५ वाजता पुण्याकडून सासवडकडे येणारी टोयोटा हायरायडर (एमएच ४० सीक्यू ४०४०) ही कार गणेश यशवंत चौलकर हा भरधाव व निष्काळजीपणे चालवत असताना समोरून येणाऱ्या दुचाकी (एमएच १२ एनएन ७०९१) ला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार विशाल शाम मोहरकर यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. तसेच टोयोटा हायरायडर, दुचाकी आणि बलेनो कार (एमएच १२ वायडी ५५०३) यांचेही नुकसान झाले.या घटनेप्रकरणी कृष्णा शाम मोहरकर (वय ३५, धंदा नोकरी, सध्या रा. १०७७, शुक्रवार पेठ, हिराबाग, पुणे, मूळ रा. जेजुरी, ता. पुरंदर) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या गुन्ह्याची नोंद सहाय्यक फौजदार जाधव यांनी केली असून पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे (बकल क्रमांक १९९३) करीत आहेत. या प्रकरणावर पोलीस निरीक्षक घोळवे यांचे मार्गदर्शन आहे.

द•ख•ल

## मुंढेकरवाडीचा भूमीपुत्र यश कुरुमकर प्रशिक्षण पूर्ण करून देशसेवेसाठी सज्ज



**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव कार्यक्षेत्रातील मुंढेकरवाडी येथील प्रगतिशील आणि अभ्यासू शेतकरी ॲड.प्रदीप संभाजी कुरुमकर यांचा भाऊ, संभाजी हौसराव कुरुमकरयांचा तो मुलगा आहे. यश कुरुमकर याने नुकतेच बॉम्बे सेपर्स पुणे येथे आपले भारतीय सैन्य दलाचे कठीण मिलिटरी प्रशिक्षण पूर्ण केले आणि राजस्थान रेजिमेंट २६७ करिता बिकानेर येथे देशसेवेसाठी सज्ज होऊन आपल्या आईवडिलांचे, गावचे आणि परिसराचे नाव अभिमानाने उज्वल केले आहे. श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातून बारावी क्रॉप सायन्स उत्तीर्ण होऊन त्याने महाविद्यालयाच्या श्री छत्रपती अकॅडमी मध्ये प्रशिक्षण घेतले, येथेच इ- पदवी आणि NCC देखील पूर्ण केले.प्रा वैभव सोनवणे, प्रा. डॉ सतीश चोरमले, प्रा. एन टी पवार, प्रा. डॉ महेश गिरमकर,यांचे त्याला उत्तम प्रकारे मार्गदर्शन लाभले. सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, संदीप औटी, डॉ. सतिशचंद्र सूर्यवंशी, प्रा. सुनील माने आदींनी त्याचे अभिनंदन केले आहे.

## लिंपणगावमध्ये पल्स पोलिओ मोहिमेस उत्तम प्रतिसाद



**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव कार्यक्षेत्रात २८ जून रोजी आरोग्य विभाग अंतर्गत पल्स पोलिओ मोहीमेला उत्तम प्रकारे प्रतिसाद मिळाला. यावेळी जवळपास ९०% च्या पुढे ते ५ वर्षापर्यंत सर्व मुलांना पल्स पोलिओचे दोन थेंब देण्यात आले. या पल्स पोलिओचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर व गावचे माजी सरपंच अरविंद कुरुमकर यांच्या हस्ते आयोजित करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुखदेव वाल्हेकर लिंपणगावच्या आरोग्य उप केंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ पल्लवी साबळे, आरोग्य सेविका श्रीमती नवले मनीषा आरोग्य सेवक नेताजी ठुबे, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस यावेळी उपस्थित होत्या. आरोग्य विभागाच्या सूचनेनुसार आपली दोन थेंबाची जबाबदारी पोलिओमुक्त भारताची तयारी या मोहिमेअंतर्गत २८ जून रोजी सर्व आरोग्य उपकेंद्रांमध्ये राबविण्यात आली. प्रामुख्याने लिंपणगाव, होलेवाडी, मुंढेकरवाडी, पवारवाडी आणि शेंडेवाडी येथील सर्व लहान बालकांना पल्स पोलिओची लस देण्यात आली. या कामी लिंपणगाव आरोग्य उपकेंद्राच्या सर्व सेवक वर्गाने सायंकाळी पाच वाजेपर्यंत पर्स लसीकरण मोहीम उत्तम प्रकारे राबवली.

## आव्हाणे येथे पल्स पोलिओ लसीकरण मोहीम उत्साहात



**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील आव्हाने बुद्रुक येथे पल्स पोलिओ अभियान उत्साहात. पल्स पोलिओ मोहीमेचा शुभारंभ बाबासाहेब चोथे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संजय कोळगे, सुभाष दिघे, बाबासाहेब चोथे, नानासाहेब खैरे, संजय नांगरे, सुधाकर चोथे, बबन ठाणगे, संदिप कोळगे, गोरक्षनाथ कोळगे, ईश्वर जगताप, रघुनाथ कांबळे, वसंत खैरे, आरोग्य सेविका, सुवर्णा भिसे, आशा स्वयंसेविका, सविता दुधाळ, मंगल डुरे, सविता मिसाळ, सविता दुधाळ उपस्थित होते. यावेळी बोलताना आरोग्य सेविका भिसे म्हणाल्या की पल्स पोलिओ लसीकरण मोहीमे अंतर्ग २१० लाभार्थींना डोस देण्यात येणार आहे.

## श्रीगोंदा तालुक्यात वरुणराजाची दमदार हजेरी बळीराजा सुखावला : पिकांना जीवदान

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात शनिवारी तसेच रविवारी वरुणराजाने दमदार हजेरी लावत सर्वदूर समाधानकारक पाऊस बरसवला. या पावसामुळे शेतातील पिकांना नवसंजीवनी मिळाली असून अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले आहे. मागील काही दिवसांपासून पावसाअभावी पिके कोमेजण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र झालेल्या पावसामुळे मका, बाजरी, सोयाबीन, कापूस तसेच अन्य खरीप पिके पेरणीसाठी मोठा दिलासा मिळाला आहे. पावसाचे पाणी शेतात साचल्याने पिकांची वाढ जोमाने होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या पावसामुळे विहिरी, बोअरवेल आणि लहान-मोठ्या जलस्रोतांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता असून अनेक गावांवरील संभाव्य पाणीटंचाईचे संकटही सध्या दूर झाल्याचे चित्र आहे.दरम्यान, पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांनाही मोठा दिलासा मिळाला. सायंकाळी थंडगार वाऱ्यासह झालेल्या पावसाने वातावरण आल्हाददायक झाले.वेळेवर झालेल्या या पावसामुळे खरीप हंगामाला बळ मिळाले असून, यंदाच्या हंगामाकडून शेतकऱ्यांच्या अपेक्षा पुन्हा उंचावल्या आहेत.

## ढोरजळगांवला रविवारी जोरदार पाऊस

**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील ढोरजळगांव येथे एक महिन्याच्या प्रतिक्षेनंतर रविवारी सायंकाळी ५ वा. मुसळधार पावसाने हजेरी लावली असुन बळीराजा सुखावला आहे. गेल्या महिन्याभरापासून शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत होता जोरदार पावसामुळे खरीपाच्या पेरणीला वेग आला आहे. जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये सध्या आनंदाचे वातावरण दिसुन येत आहे. शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली असून तालुक्याच्या ठिकाणी कृषी केंद्रावर शेतकऱ्यांची गर्दी दिसू लागली आहे.

# श्री शिवराज्याभिषेक उत्सवाने जामखेड शिवमय

### रक्तदान, किर्तन, पोवाडे, जलाभिषेक व ऐतिहासिक मिरवणुकीने जल्लोष

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, अर्थात हिंदवी स्वराज्य दिनानिमित्त जामखेड येथे श्री शिवराज्याभिषेक उत्सव समितीच्या वतीने दि. २३ ते २७ जून २०२६ या कालावधीत आयोजित श्री शिवराज्याभिषेक उत्सव सोहळा उत्साहात व शिवमय वातावरणात संपन्न झाला. धार्मिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांच्या मालिकेने जामखेड नगरी पाच दिवस अक्षरशः शिवभक्तीत न्हाऊन निघाली.**



**पाच दिवसीय कीर्तन-पोवाड्यांचा भव्य कार्यक्रम**

उत्सवाची सुरुवात दि. २३ जून रोजी विनोदसम्राट ह भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे, नेवासा यांच्या विनोदी शैलीतील कीर्तनाने झाली. दि २४ जून रोजी भागवताचार्य ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, केज यांनी प्रखर वाणीने भागवत कीर्तनातून प्रबोधन केले. दि. २५ जून रोजी गौरव महाराष्ट्राचा शिवशाहीर पृथ्वीराज माळी, सांगली यांच्या शौर्यगाथा व पोवाड्यांनी उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले.

दि. २६ जून हा दिवस सामाजिक बांधिलकीचा ठरला. सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित भव्य रक्तदान शिबिरात १७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक कर्तव्य बजावले. सायंकाळी कीर्तनचंद्रिका ह.भ.प. रोहिणी परांजपे-माने, पुणे यांनी राजमाता जिजाऊ - महिला सक्षमीकरणया विषयावर प्रबोधनात्मक कीर्तन केले. 'मुलगी वाचवा, समाजात सकारात्मक बदल घडवा' हा संदेश त्यांनी दिला. महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. दररोजच्या कार्यक्रमात शिवप्रेमी व माता-भगिनींची संख्या उल्लेखनीय होती. पावसाची शक्यता लक्षात घेऊन संपूर्ण वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आला होता. शिव महाप्रसादाचे नियोजनही उत्कृष्ट पद्धतीने करण्यात आले.

**तालुक्याचा मान वाढवणाऱ्यांचा गौरव :**

उत्सव समितीच्या वतीने जामखेड तालुक्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू, सैन्य व पोलीस दलात भरती झालेले युवक, शासकीय सेवेत रुजू झालेले अधिकारी व आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात आला.

**शिवराज्याभिषेक दिनी शिवमय पहाट व ऐतिहासिक मिरवणूक**

दि. २७ जून, शनिवारी पहाटे ५ वाजता सप्तनद्या, गडकोट व तीर्थक्षेत्रांहून आणलेल्या पवित्र जलाने व वेदमंत्रांच्या घोषात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीवर जलाभिषेक करण्यात आला. पहाटेच्या या सोहळ्यास जामखेडकर शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते.

## खर्डा व मोहरी नागोबाच्यावाडीत जिओ टॉवर बंद

### वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे

दत्तराज पवार। राष्ट्र सह्याद्री

**खर्डा :** खर्डाशहरासहमोहरी, नागोबाची वाडी परिसरातील जिओ कंपनीचे मोबाईल टॉवर गेल्या काही दिवसांपासून वारंवार बंद पडत असल्याने ग्राहक,व्यापारी,विद्यार्थी तसेच प्रशासकीय अधिकारी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसल्यामुळे फोन लागत नाहीत, इंटरनेट सेवा खंडित होते तसेच ऑनलाइन व्यवहार, बँकिंग, शासकीय कामकाज आणि विविध डिजिटल सेवा ठप्प होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांनी व ग्राहकांनी अनेक वेळा जिओ कंपनीच्या ग्राहक सेवा केंद्राशी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून समस्या मांडली. मात्र,त्याकडे गांभीर्याने लक्ष न देता उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.खर्डा व परिसरातील अनेक व्यापाऱ्यांचे ऑनलाइन व्यवहार मोबाईल नेटवर्कवर अवलंबून आहेत.टॉवर बंद पडल्यामुळे यूपीआय व्यवहार,ऑनलाइन पेमेंट,बँकिंग सेवा तसेच इतर महत्त्वाची कामे ठप्प होत असून ग्राहक व व्यावसायिकांना आर्थिक नुकसानही सहन करावे लागत आहे.

तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनाही दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होत असल्याचे सांगितले जात आहे. देशातील नामांकित रिलायन्स जिओ कंपनीच्या सेवेबाबत वारंवार अशा तक्रारी समोर येत असल्याने कंपनीच्या सेवा गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

त्यामुळे जिओ कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने या समस्येची दखल घेऊन खर्डा, मोहरी नागोबाची वाडी व परिसरातील टॉवर नियमित कार्यरत ठेवावेत आणि ग्राहकांना अखंडित व दर्जेदार सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## पैठण - पंढरपूर पालखी मार्गाचे रखडलेले काम कधी पूर्ण होणार?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**हातगाव :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री क्षेत्र पैठण येथून श्री क्षेत्र पंढरपूर या ठिकाणी अंदाजे २८५ की मी चे अंतर कापून १७ मुक्कामानंतर १८ व्या मुक्कामी पंढरपुरात दाखल होणाऱ्या पाई पालखी सोहळ्याचे हे ४२८ वे वर्ष असून हा सोहळा येत्या ७ जुलै रोजी पैठण येथून प्रस्थान होत आहे. मात्र या दोन्ही तीर्थ क्षेत्रांना जोडणाऱ्या पालखी मार्गास राष्ट्रीय महामार्गाचा (७५२ ई) दर्जा प्राप्त होऊन जवळपास ८ वर्षाचा कालावधी होत आला असताना सुद्धा या मार्गाचे अजूनही काम रखडलेलेच असून ते पूर्ण होत नसल्याने या मार्गावरील अनेक गावातील नागरिकांमध्ये आणि विशेष करून भाविक - भक्तांमध्ये मोठा नाराजीचा सूर असल्याची चर्चा ऐकावयास मिळत आहे. सन १७/१८ साली तत्कालीन केंद्रीय दळण - वळण मंत्री ना.नितीन गडकरी यांनी शेकडो वर्षांपासूनच्या या पाई पालखी मार्गास राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देऊन या मार्गासाठी लागणाऱ्या निधीसही मंजुरी दिलेली आहे. त्या त्यास मधला एवढा मोठा काळ गेला असून सुद्धा या मार्गाचे काम पूर्ण झालेले नाही. संभाजीनगर,अहिल्यानगर व सोलापूर या तीन जिल्ह्याच्या हद्दीतून जाणारा हा मार्ग असून या मार्गाचे अनेक ठिकाणी अजूनही कामा मोठ्या प्रमाणात काम रखडले असून गत वर्षी बराच काळ ठेकेदारामार्फत बंद पडलेल्या या कामाची आमदार मोनिकाताई राजळे यांनी दखल घेत आपल्या पाथर्डी व शेवगाव मतदार संघाच्या हद्दीतून गेलेल्या मार्गावरील अनेक गावात जाऊन मार्गालगत असणाऱ्या शेतकऱ्यासह राष्ट्रीय महामार्गाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आणि मार्गाचे काम करत असलेल्या ठेकेदाराच्या बैठका घेऊन त्यांना सविस्तर मार्गदर्शन करून रखडलेल्या कामास पुन्हा तातडीने सुरुवात करून लवकरात लवकर हे काम कसे पूर्ण होईल असे सांगण्यात आले होते.

## संत एकनाथ महाराज पालखी सोहळा

### प्रशासनाकडून पूर्व नियोजनाची पाहणी; जिल्हा परिषदेकडून मिळणार निधी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**खर्डा :** पैठण येथील श्री संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याच्या खर्डा येथील मुक्कामाच्या पार्श्वभूमीवर, प्रशासकीय पातळीवर पूर्व नियोजनाची जोरदार तयारी सुरू झाली आहे. या नियोजनाची प्रत्यक्ष पाहणी व माहिती घेण्यासाठी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके आणि जामखेडचे गट विकास अधिकारी शुभम जाधव यांनी नुकतीच खर्डा गावाला भेट देऊन विविध ठिकाणची पाहणी केली. संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे खर्डा येथे आ गमन झाल्यानंतर,मुख्य रस्त्यावरून पालखी मार्गस्थ होत खर्डा येथील मुख्य रस्त्यावरील ऐतिहासिक 'राम हवेली' मध्ये पालखीचा मुक्काम असतो.या मुख्य मुक्कामाच्या जागेची अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

यावर्षी वारकऱ्यांची निवास व भोजन व्यवस्था वेगवेगळ्या ठिकाणी विभागून करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने:लद्दड बोळ परिसर,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,मार्केट यार्ड परिसर या सर्व ठिकाणी वारकऱ्यांसाठी निवास आणि महाप्रसादाची (भोजन) उत्तम व्यवस्था केली जाणार आहे.

वारी दरम्यान खर्डा येथे येणाऱ्या हजारो वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून स्वच्छ पिण्याचे पाणी, तात्पुरती व कायमस्वरूपी स्वच्छतागृहे,आरोग्यासाठी २४ तास तैनात असणारे वैद्यकीय पथक आणि राहण्याची सुरक्षित व्यवस्था यांबाबत दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती घेतली.

## सुट्टीच्या दिवशीही प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** लोकप्रतिनिधी, प्रशासन, शेतकरी आणि शिवपानंद शेत रस्ते चळवळीच्या समन्वयातून श्रीगोंदा तालुका राज्यासाठी दिशादर्शक ठरत आहे. शेतकऱ्यांच्या हक्काच्या रस्त्यांसाठी प्रशासनाने सुट्टीच्या दिवशीही प्रत्यक्ष बांधावर जाऊन काम केल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. २६ जून रोजी शासकीय सुट्टी असतानाही आणि पावसामध्ये चिखल तुडवत अधिकारी व कर्मचारी शेतकरी हितासाठी बांधावर पोहोचले. *श्रीगोंदा-पारनेर उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार सचिन डोंगरे, भूमी अभिलेख उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक तथा क्षेत्रीय समिती सदस्य दादासाहेब जंगले पाटील यांच्या उपस्थितीत टाकळी लोणार-कोसेगव्हाण येथील सुमारे दीड किलोमीटर शिवरस्त्याचे यशस्वी सीमांकन करण्यात आले.

मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी ही प्रक्रिया पूर्ण केली. कर्तव्यदक्ष महसूल मंडळ अधिकारी बाळासाहेब सुद्रिक यांच्या उपस्थितीत ही कारवाई पार पडली. यावेळी सरपंच दरोडे टाकळी, शेतकरी बोडखे, विष्णू ढवळे, फंड साहेब, राजेंद्र फंड, माणिकराव फंड धनंजय कदम ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते. घोषणांचा गाजावाजा नाही प्रत्यक्ष बांधावर काम! पाऊस, चिखल आणि सुट्टीची पर्वा न करता प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी! राज्यातील शेवटच्या शेतकरी बांधवाला हक्काचा रस्ता मिळेपर्यंत संघर्ष आणि पाठपुरावा सुरूच राहील. असे शेत पानंद रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

## कृषी दूतांकडून शेतकऱ्यांना बीजप्रक्रियेचे मार्गदर्शन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**कासार पिंपळगाव :** पाथर्डी तालुक्यातील आदिनाथनगर, यावर्षीच्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमध्ये बीज प्रक्रियेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने श्री. दादापाटील राजळे शिक्षण संस्थेच्या डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी तंत्र विद्यालयातील कृषी दूतांनी साकेगाव( पाथर्डी) या गावातील शेतकऱ्यांना खरीप हंगामातील पिकांच्या पेरणी करीता बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. साकेगाव येथील पाथर्डी येथील रामदास भागवत यांच्या शेतामध्ये तूर पिकाच्या पेरणी वेळी बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. यावेळी कृषी दूतांनी तूर पिकाच्या पेरणीपूर्वी बियाण्यावर बुरशीनाशक व जैविक घटकांची बीज प्रक्रिया करण्याचे महत्त्व शेतकऱ्यांना समजावून सांगितले. योग्य बीज प्रक्रियेमुळे बियाण्यांची उगवण चांगली होते, बुरशीजन्य व जमिनीतून पसरणाऱ्या रोगांपासून संरक्षण मिळते, रोपांची जोमदार वाढ होते तसेच उत्पादनात वाढ होण्यास मदत होते, अशी माहिती यावेळी देण्यात आली. शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी ट्रायकोडर्मा या जैविक बुरशी नाशकाची बीज प्रक्रिया करून दाखविण्यात आली.

बीज प्रक्रिया करताना औषधांचे योग्य प्रमाण, प्रक्रिया करण्याची पद्धत व बीज प्रक्रिया करताना घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित शेतकऱ्यांनी कृषी दूतांना तुर पिकाबाबत विविध प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले.

## ..तर जलसंपदामंत्र्यांच्या कार्यालयावर धडक मोर्चा : ॲड. काकडे

### 'सुधारित ताजनापूर टप्पा-१'च्या पूर्णत्वासाठी बैठक ; पाण्यासाठीची लढाई तीव्र करण्याचा निर्धार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** ताजनापूर योजनेचा प्रश्न आता निर्णायक वळणावर आला आहे. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींच्या पळकुटेपणाने लाभार्थी गावातील शेतकऱ्यांचा संयमच पाहिला असून, आपण मुर्दाडसारखे पडून राहणे योग्य नाही. इतर जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधी पाणी पळवून नेण्याच्या प्रयत्नांत असताना, धरण उशाला असूनही आपण मात्र तहानलेले आहोत. तालुक्याच्या इतिहासातील कोपरे धरणाचे पाणी लाडजळगाव पर्यंत आणू ही एक निव्वळ वल्गना ठरल्याने 'जसा या योजनेचा दहावा' घातला तशी वेळ 'ताजनापूर'वर येऊ नये यासाठी वेळीच जागे होऊन पाणी मिळेपर्यंत मागे हटायचे नाही, असा एल्गार ॲड. शिवाजीराव काकडे यांनी पुकारला आहे. शासन-प्रशासनाने हा प्रश्न तातडीने न सोडवल्यास थेट राज्याचे उपमुख्यमंत्री, जलसंपदामंत्री आणि पालकमंत्र्यांच्या कार्यालयावर जाहीर मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

'सुधारित ताजनापूर टप्पा-१' या योजनेच्या पूर्णत्वासाठी शेवगाव येथील श्री संत गाडगे महाराज छात्रालयामध्ये रविवारी (दि. २८) लाभार्थी गावातील शेतकरी, युवक आणि महिलांची अत्यंत निर्णायक बैठक ॲड. काकडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी मा.जि.प.सदस्या सौ. हर्षदा काकडे, माणिक म्हस्के, जगन्नाथ गावडे, नवनाथ ढाकणे, लक्ष्मण गवळी, अर्जुन ढाकणे, मधुकर झिरपे, रामजी पोटफोडे, बंडूभाऊ म्हस्के, रामराव ढाकणे, संजय काकडे, प्रमोद तांबे, गोरक्ष भोसले, अरुण खर्चन, मच्छिंद्र भापकर, रंगनाथ ढाकणे, प्रा.दादासाहेब जवरे, विठ्ठल केदार, नारायण टेकाळे आदी उपस्थित होते.



या बैठकीत जुनी ताजनापूर कृती समिती बरखास्त करून नव्या कृती समितीची घोषणा करण्यात आली. समितीच्या निमंत्रकपदी लक्ष्मणराव गवळी यांची निवड करण्यात आली आहे. याशिवाय, योजनेत समाविष्ट असलेल्या प्रत्येक गावात महिला व युवकांसह स्वतंत्र ग्रामस्तरीय कृती समित्या स्थापन केल्या जाणार आहेत. या समित्यांच्या माध्यमातून पुढील आंदोलनाची दिशा ठरवून संघर्ष अधिक तीव्र केला जाणार आहे. शासनाचे आणि संबंधित विभागाचे लक्ष वेधण्यासाठी कृती समितीच्या माध्यमातून पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यात आली असुन जर शासन आणि प्रशासनाने ताजनापूर योजनेचा प्रश्न तातडीने निकाली काढला नाही, तर थेट राज्याचे उप मुख्यमंत्री आणि जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री यांच्या कार्यालयावर जाहीर मोर्चा काढण्यात येईल, असा स्पष्ट मनोदय समितीचे अध्यक्ष ॲड.काकडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

**नव निर्वाचित ताजनापूर कृती समिती**

सखाहरी भापकर, भाऊसाहेब बोडखे, माणिक म्हस्के, गोरक्ष वावरे, ॲड.संजय काकडे, विठ्ठल केदार, विष्णू शिरसाठ, प्रा.दादासाहेब जवरे, सुधाकर धावणे, नवनाथ ढाकणे, संदीप झिरपे, वीर भाऊसाहेब, अन्साराम बोडखे तर निमंत्रक म्हणून लक्ष्मणराव गवळी यांचेसह नवीन कृती समिती स्थापन करण्यात आली आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.२९ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## साडेसहा कोटींचा शेअर मार्केट घोटाळा प्रकरणी एकाला अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : अहिल्यानगर येथील आर्थिक गुन्हे शाखेने शेअर मार्केटमध्ये अल्पावधीत मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून साडेसहा कोटी रुपयांची फसवणूक करून फरार असणारा विजय तबाजी काळे (वय ३९,रा घुलेवाडी)या मुख्य गुन्हेगाराला अटक केली आहे. विजय काळे याने अनेक गुंतवणूक दारांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्यामुळे त्याच्यावर मागील महिन्यात संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता तेव्हापासून तो फरार झाला होता त्याचा पोलीस शोध घेत होते अखेर त्यास अहिल्या नगर जिल्हा आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने २७ जून, २०२६ रोजी अटक करून न्यायालयात उभे केले होते त्यास न्यायालयाने २९ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.या गंभीर आर्थिक घोटाळ्याचा पुढील सखोल तपास सध्या आर्थिक गुन्हे शाखा करत आहे.

## संगमनेरात गोवंश कत्तलखान्यावर एलसीबीचा छापा, तिघांना अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : शहरातील एका कॉलनी परिसरात सुरू असलेल्या कथित अवैध गोवंश कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेने रविवारी पहाटे धाडसी छापा टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत तीन आरोपीना अटक करण्यात आली असून, तब्बल १५ लाख ८५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणातील सहा आरोपी फरार असून त्यांचा पोलीसांकडून शोध सुरू आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका एम सुदर्शन यांच्या आदेशानुसार आणि अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या सुचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महादेव गुट्टे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

गुप्त माहितीच्या आधारे पथकाने सरकार लॉन्सजवळील काटवण परिसरात पहाटे छापा टाकला. त्यावेळी काही जण गोवंशीय जनावरांची कत्तल करत असल्याचे आढळून आले. पोलिसांची चाहूल लागताच काही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

अब्दुलनूर जब्बार कुरेशी (वय २०), इमाम हुसेन शेख (वय २८),आणि अहमद फारून शहा (वय ३२), सर्वजण,रा. संगमनेर ) या तिघांना जेरबंद केले. या चौकशी दरम्यान अवैध कत्तल प्रकरणातील आणखी सहा साथीदारांची नावे समोर आली असून ते फरार आहेत. त्या आरोपी कडून ३१०० किलो गोमांस - किंमत १९.३० लाख,एक पिकअप वाहन किंमत ६ लाख,चार मोबाईल फोन किंमत ५५ हजार,सुरा, कुऱ्हाड व इतर साहित्य, असा १५,८५,५०० एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच प्राणी संरक्षण अधिनियमातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करत आहेत.

या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला असून, फरार आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली.

## महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर यांच्या लग्नातील सोन्याचे गंठण लुटणारा जेरबंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : महाराष्ट्र केसरी पैलवान हर्षवर्धन सदगीर यांच्या विवाह सोहळ्यानंतर त्यांच्या नातेवाईक महिलेच्या गळ्यातील सुमारे सहा तोळ्यांची सोन्याची पोत हिसकावून पळालेल्या सराईत चेन स्नॅचरला सिन्नर पोलिसांनी अटक केली आहे. अनिल सुभाष चिंतामणी (वय २९, रा. वडाळा महादेव, ता. श्रीरामपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून सुमारे ४ लाख ५९ हजार ५३४ रुपयांचा सोन्याचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. ११ मे २०२६ रोजी घोरवड (ता. सिन्नर) येथील आशिर्वाद लॉन्समध्ये महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर यांचा विवाह सोहळा पार पडला होता.

रात्री समारंभानंतर एक महिला शिर्डी-घोटी महामार्ग ओलांडत असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञातांनी तिच्या गळ्यातील सहा तोळ्यांची सोन्याची पोत जबरदस्तीने हिसकावून पलायन केले. याप्रकरणी सिन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक संदीपकुमार बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने सीसीटीव्ही फुटेज, फिर्यादीने दिलेले वर्णन आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीची ओळख पटवली. त्यानंतर अशोकनगर (श्रीरामपूर) येथून अनिल चिंतामणी याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने साथीदार प्रकाश गोनके (रा. उभाडे, ता. इगतपुरी, जि. नाशिक) याच्यासह सिन्नर, शिर्डी व परिसरात महिलांच्या गळ्यातील दागिने लुटल्याची कबुली दिली. तपासादरम्यान आरोपीकडून ३८.०७ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत व अन्य दागिने जप्त करण्यात आले. आरोपीविरुद्ध अहिल्यानगर, नाशिक आणि शिर्डी परिसरात यापूर्वीही सोनसाखळी चोरीचे अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक विमला एस. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कांतीलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सिन्नर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने केली. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनीषा राऊत करीत आहेत.

# दिघोळ वनक्षेत्रात दुग्धजन्य पावडरच्या ६० गोण्या बेवारस



**समीर शेख | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : राज्यात अन्नभेसळीविरोधात सुरू असलेल्या कठोर कारवाईमुळे भेसळखोरांमध्ये चांगलीच धास्ती निर्माण झाली आहे . त्याच पार्श्वभूमीवर जामखेड तालुक्यातील दिघोळ-तेलंगशी रस्त्यालगत वन विभागाच्या हद्दीत अज्ञात व्यक्तींनी दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पावडरसदृश पदार्थाच्या तब्बल ५० ते ६० गोण्या बेवारस अवस्थेत टाकून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे जामखेड तालुक्यात एकच खळबळ उडाली असून शेतकरी, पशुपालक आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. २६ जून रोजी परिसरातील एका शेतकऱ्याच्या निदर्शनास आले की, वन विभागाच्या जागेत मोठ्या प्रमाणात पावडरने भरलेल्या गोण्या टाकल्या. संबंधित शेतकऱ्याने तातडीने दिघोळचे सरपंच दशरथ राजगुरू यांना याची माहिती दिली. त्यानंतर सरपंच राजगुरू यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. गोण्यांचा एवढा मोठा साठा रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तींनी येथे आणून टाकल्याचा प्राथमिक अंदाज ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. घटनेची गंभीर दखल घेत सरपंच दशरथ राजगुरू यांनी तात्काळ खर्डा पोलीस स्टेशन व वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली.

त्यानंतर खर्डा पोलीस आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. विशेष म्हणजे, या परिसरात खर्डा, तेलंगशी, दिघोळ, माळवाडी, जायभायवाडी, मोहरी आणि जातेगाव आदी गावांमध्ये अनेक दूध संकलन केंद्रे कार्यरत आहेत. त्यामुळे या बेवारस गोण्यांचा आणि दुग्ध व्यवसायाचा काही संबंध आहे का, याबाबतही विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत.

दरम्यान, या गोण्यांमध्ये नेमका कोणता पदार्थ आहे, तो निकृष्ट दर्जाचा, भेसळयुक्त किंवा वापरास अयोग्य आहे का, याबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने अथवा पशुपालकाने या पावडरचा जनावरांच्या खाद्यासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी वापर करू नये, तसेच या पदार्थापासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणाची वन विभाग, अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांनी तातडीने सखोल चौकशी करून संबंधित पदार्थाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत, तसेच हा साठा येथे टाकणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. सध्या या सर्व गोण्या घटनास्थळीच पडून असून, त्यामुळे पर्यावरण, वन्यजीव आणि जनावरांच्या आरोग्याला संभाव्य धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने या साठ्याची योग्य विल्हेवाट लावून संपूर्ण प्रकरणाचा छडा लावावा, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

राज्यात सध्या अन्न व औषध प्रशासनामार्फत भेसळीविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू आहे. आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मोहिमेमुळे भेसळखोरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कारवाईच्या धास्तीनेच हा दुग्धजन्य साठा वनक्षेत्रात टाकून दिला असावा, अशी चर्चा परिसरात रंगली आहे. मात्र, या दाव्याला अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नसून तपासानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे

अन्न औषध प्रशासन विभागाचे अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या पथकाने संपूर्ण महाराष्ट्रात छापे टाकून अनेक भेसळखोरांच्या मुसक्या आवळया व कडक कारवाई केली आहे त्याचा धसका घेऊन जामखेड तालुक्यातील काही भेसळखोरानी हि पावडर टाकल्याचा अंदाज वर्तविला जात आहे म्हणून अन्न औषध विभागाचे अधिकारी तुकाराम मुंडे काय कारवाई करणार जामखेड तालुक्यात नागरिकांचे लक्ष लागले आहे

## भंगार वेचणाऱ्या महिलेची लूट; घरी परतताना ट्रकच्या धडकेत मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : तालुक्यातील ढवळगाव येथील भंगार वेचून उदरनिर्वाह करणाऱ्या महिलेची प्रथम अज्ञातांनी चाकूचा धाक दाखवून लूट केली आणि त्यानंतर मदतीसाठी घरी परतत असताना ट्रकच्या धडकेत तिचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली.

या दुहेरी दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. संगीता परमेश्वर शिंदे (वय ५०, रा. ढवळगाव) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या नेहमीप्रमाणे रांजणगाव एमआयडीसी परिसरातील कारेगाव येथे भंगार गोळा करण्यासाठी गेल्या होत्या. दिवसभर काम करून सायंकाळी घरी परतण्यासाठी वाहनाची वाट पाहत असताना त्या एका चारचाकी वाहनात बसल्या. त्यावेळी वाहनातील दोन ते तीन अज्ञात व्यक्तींनी चाकूचा धाक दाखवून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने, रोख रक्कम व इतर साहित्य लुटल्याचा आरोप आहे. त्यानंतर आरोपींनी त्यांना शिरूर येथील मगर हॉस्पिटल परिसरात रस्त्यावर सोडून पळ काढल्याचे सांगितले जाते. घाबरलेल्या अवस्थेत संगीता शिंदे यांनी मोबाईलवरून कुटुंबीयांशी संपर्क साधून घडलेला प्रकार सांगितला.

त्यानंतर तेथून जाणाऱ्या एका परिचित व्यक्तीने त्यांना दुचाकीवरून घरी सोडण्यासाठी निघाले. मात्र, काही अंतरावर मागून भरधाव आलेल्या एमएच-२० सीटी-९०९१ क्रमांकाच्या ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात संगीता शिंदे गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने शिरूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी शिरूर पोलिसांनी अपघातग्रस्त ट्रक ताब्यात घेतला असून चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच लुटीचा आरोप असलेल्या अज्ञात आरोपींचाही शोध सुरू असल्याची माहिती मिळाली. भटक्या-विमुक्त समाजातील अत्यंत गरीब कुटुंबातील संगीता शिंदे यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबाचा आधार हरपला आहे.

या संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करून लुटीतील आरोपींना तातडीने अटक करावी, अपघातासाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करावी तसेच मृत महिलेच्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# जायकवाडी जलाशयावर वन विभागाची मोठी कारवाई

## लहान माशांची शिकार करून वाहतूक करणारी तीन वाहने ताब्यात



**प्रविण खोमणे | राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव** : जायकवाडी जलाशय परिसरात अवैधरीत्या लहान आकाराच्या माशांची शिकार करून त्यांची वाहतूक होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पैठण वन विभागाने शनिवारी (दि. २७) दुपारी दहिफळ येथे मोठी कारवाई केली. या कारवाईत लहान माशांनी भरलेली दोन पिकअप व एक आयशर अशी तीन वाहने ताब्यात घेण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

ही कारवाई वन अधिकारी वैशाली शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मात्र, या कारवाईनंतर काही स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दबावामुळे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. तसेच कारवाईबाबत अधिकृत माहिती देण्यास संबंधित अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केल्याने या प्रकरणाबाबत विविध तर्कवितर्क व्यक्त होत आहेत.

जायकवाडी जलाशय हा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील (इको सेन्सिटिव्ह झोन) तसेच पक्षी अभयारण्य क्षेत्रात येतो. या परिसरात मच्छरदाणीचा वापर करून मासेमारी करण्यास बंदी असून, पक्ष्यांच्या अन्नसाखळीचे संरक्षण करण्यासाठी ५०० ग्रॅमपेक्षा कमी वजनाचे मासे पकडण्यास मनाई आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून काही जण मच्छरदाणीच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर माशांचे बी-बियाणे नष्ट करीत असल्याचा आरोप स्थानिक मच्छीमारांकडून केला जात आहे. शेवता, सावखेडा, ताजनापूर, नवीन दहिफळ, खिर्डी, महालक्ष्मीखेडा, गंध्या, रामढव, वरखेड, लोहगाव एमआयडीसी, वज्जर, दुर्गवाडी, धनगरपट्टी, प्रवरा संगम आदी भागांतही अशाच प्रकारे अवैध मासेमारी सुरू असल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे. या प्रकारामुळे जलाशयातील जैवविविधता तसेच पक्ष्यांच्या खाद्यसाखळीवर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

मच्छीमार समाजातील काही प्रतिनिधींच्या मते, केवळ मोजकेच लोक मच्छरदाणीचा वापर करून मोठ्या प्रमाणावर माशांचे बी-बियाणे नष्ट करीत आहेत. याबाबत अनेक वेळा निवेदने देऊनही प्रभावी कारवाई झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला. काही भागांत ट्रॅक्टरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात मासेमारी होत असल्याचेही त्यांनी सांगितले. वन विभागाने या प्रकाराविरोधात प्रथमच मोठी कारवाई केल्याचे सांगितले जात असले, तरी जायकवाडी परिसरात अनेक ठिकाणी अशाच प्रकारे अवैध मासेमारी सुरू असल्याने व्यापक आणि सातत्यपूर्ण कारवाईची मागणी नागरिक व मच्छीमारांकडून होत आहे.

### कारवाईबाबत माहिती देण्यास टाळाटाळ

*दहिफळ येथे झालेल्या कारवाईबाबत अधिकृत माहिती मिळविण्यासाठी पत्रकारांनी वनाधिकारी वैशाली शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक माहिती देण्यात आली नाही. कारवाईचे नेतृत्व करणाऱ्या वन अधिकारी वैशाली शिंदे यांनी आपला मोबाईल बंद करून ठेवला .. त्यानंतर रविवारी सकाळी अनेक वेळा त्यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी फोन उचलल नाही .. त्यामुळे या कारवाईबाबत अधिकृत अहवाल अद्याप उपलब्ध झालेला नाही.*

### प्रेस नोट देण्यास सांगतो - वनपरिक्षेत्र अधिकारी विश्वास थोरात

*या कारवाईबाबत विचारणा केली असता पैठणचे वनपरिक्षेत्र अधिकारी विश्वास थोरात यांना याबाबत विचारले असता त्यांनी तत्काळ शिंदे यांना तुम्हास प्रेस नोट देण्यास सांगतो असे म्हणाले परंतु ते शेवटी प्रेस नोट मिळालीच नाही.*

### व्यापक कारवाईची मागणी

*जायकवाडी जलाशयातील अनेक भागांत अवैध मासेमारी सुरू असल्याचा दावा स्थानिकांकडून केला जात आहे. त्यामुळे केवळ एक-दोन कारवायांवर न थांबता संपूर्ण जलाशय परिसरात सातत्यपूर्ण व प्रभावी मोहिम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.*

## तरुणी व तिच्या कुटुंबीयांना जातीवाचक शिवीगाळ

## तरुणाविरुद्ध ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी शहरातील एका नोकरदार तरुणीला सोशल मीडियावर वारंवार त्रास देत तिच्यासह कुटुंबीयांना जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शाहबाज हबीब सय्यद (रा. सडे, ता. राहुरी) हा संबंधित तरुणीला इन्स्टाग्रामवर सातत्याने संदेश पाठवत होता. तरुणीने त्याला संपर्क न करण्यास सांगूनही तो वारंवार मैत्रीचा आग्रह धरत होता. प्रतिसाद न मिळाल्याने त्याने तरुणीच्या कुटुंबीयांना जातीवाचक शिवीगाळ केल्याचा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर पाठवल्याचा आरोप आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर तरुणीच्या नातेवाईकांनी आरोपीला जाब विचारला असता त्याने त्यांनाही जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, काही नागरिकांनी आरोपीला पकडून मारहाण केल्यानंतर त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. या घटनेनंतर मोठ्या संख्येने भीमसैनिकांनी राहुरी पोलीस ठाण्यात जमून आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली. तरुणीच्या भावाच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम ७८(२), ३५१(२), ३५२ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास श्रीरामपूर विभागाचे पोलीस उपअधीक्षक जयदत्त भवर करीत आहेत.

# धनगरवाडी-दिघी येथील अखंड हरिनाम सप्ताह स्थळाची ना. राधाकृष्ण विखे पाटलांकडून पाहणी

## परिसराच्या विकासासाठी ४ कोटींचा निधी मंजूर!

**किरण शिंदे | राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी** : श्री योगीराज सद्गुरू गंगागिरीजी महाराज यांच्या १७९व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन यंदा धनगरवाडी, दिघी पंचक्रोशीत करण्यात आले आहेत. या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना.डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी सरला बेटाचे मठाधिपती पूज्य रामगिरीजी महाराज यांच्या समवेत सप्ताह स्थळाची प्रत्यक्ष पाहणी केली आणि पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेतला.

### विखे पाटील कुटुंबियाचे सरला बेटाशी जिव्हाळ्याचे संबंध: महंत रामगिरी महाराज

याप्रसंगी सरला बेटचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांनी विखे कुटुंबाच्या योगदानाचा गौरव केला. ते म्हणाले की, विखे कुटुंब आणि सरला बेटाचे नाते अत्यंत जुने आणि जिव्हाळ्याचे आहे. स्वर्गीय बाळासाहेब विखे पाटील यांनी देखील सातत्याने बेटाच्या विकासासाठी मोठे प्रयत्न केले आणि सतत संपर्क ठेवला. तोच वारसा ना. राधाकृष्ण विखे पाटील पुढे चालवत आहेत.

यावेळी भाविकांच्या सुविधेसाठी आणि परिसरातील रस्त्यांच्या दुरवस्थेवर मात करण्यासाठी ना. विखे पाटील यांनी तात्काळ ४ कोटी रुपयांचा विकास निधी मंजूर केल्याची मोठी घोषणा केली.त्यांच्या या जलद निर्णयाबद्दल स्थानिक ग्रामस्थांनी त्यांचे विशेष आभार मानत जाहीर सत्कार केला.



यावेळी महत्त्वपूर्ण पाहणी दौऱ्याप्रसंगी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याचे दिसून आली. यावेळी, प्रांताधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर,सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व महावितरणचे वरिष्ठ अधिकारी, सप्ताह कमिटीचे पदाधिकारी, पंचक्रोशीतील भाविक आणि धनगरवाडी-दिघी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सप्ताहाच्या निमित्ताने होणाऱ्या या ४ कोटींच्या विकासकामांमुळे केवळ सप्ताहाच्या काळातील भाविकांची सोय होणार नसून, परिसरातील रस्ते आणि पायाभूत सुविधांचा प्रश्न कायमचा सुटणार असल्याने पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण आहे.

### तर, हा माझा परमभाग्याचा दिवस : ना. विखे पाटील

प्रशासकीय अधिकारी आणि ग्रामस्थांशी संवाद साधताना पालकमंत्री विखे पाटील म्हणाले,अखंड हरिनाम सप्ताहाची समृद्ध आध्यात्मिक परंपरा जपणारा हा सोहळा दरवर्षी लाखो भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र ठरतो. भाविकांच्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे निर्माण होणारे नियोजन आणि शिस्तबद्ध आयोजन याची जागतिक स्तरावरही दखल घेतली गेली आहे. यंदाच्या सप्ताहाचे नियोजन करण्याची जबाबदारी मला मिळणे, हे मी माझे परमभाग्य समजतो. हा सोहळा लोकसहभागातून भक्तिमय, सुव्यवस्थित आणि यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.